बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९७४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ०१ | बुधवार,दि.१३ डिसेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

जुन्या पेंशन करीता विधानभवनावर धडकले लाखो कर्मचारी

गुरुवारपासून बेमुदत संप

नागपूर – ङ्गजुन्या निवृत्तिवेतन योजनेच्या मागणीबाबत केंद्र-राज्य सरकार सकारात्मक आहे. बुधवारी विविध संघटनांशी चर्चा करणार आहोत. त्यामुळे राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांनी १४ डिसेंबरला पुकारलेला संप स्थगित करावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी केले. मात्र, ङ्गजुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी फक्त सकारात्मकता दर्शविली आहे. यासाठी वेळकाढूपणाचा अवलंब करण्यात येत आहे. याच्या निषेधार्थ गुरुवारी सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार आहेफ, असे अधिकारी महासंघाचे ग. दि. कुलथे व विनोद देसाई यांनी सांगितले.

सन २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी योजना लागू करण्याबाबत सरकारने निवृत्त सनदी अधिकारी सुबोध कुमार, सुधीर श्रीवास्तव आणि के. पी. बक्षी यांची समिती नेमली होती. या समितीचा अहवाल सरकारला प्राप्त झाला असून, त्यातील शिफारशींवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर प्राथमिक चर्चा झाली आहे. सरकार जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा विचार करीत आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन आणि राज्याचे उत्पन्न याचा ताळमेळ साधण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी सरकार याबाबतचा निर्णय घेईल, अशी ग्वाही पवार यांनी विधान परिषदेतही दिली. "आजची नवीन पिढी आपल्या आई-वडिलांबरोबर कसे वागते हे सर्वांना माहीत आहे.

उतारवयात मुले त्यांना विचारत नाहीत. अशावेळी निवृत्ती वेतन असेल, तरच कर्मचाऱ्यांना आधार मिळू शकतो. त्यामुळे सरकार यावर सकारात्मक विचार करीत असून, येणाऱ्या काळात राज्यात कोणाचेही सरकार असले तरी त्यावर आर्थिक ताण पडू नये आणि कर्मचाऱ्यांनाही न्याय मिळाला, असा मध्यममार्ग काढण्यात येणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

ङ्गराज्य सरकारने जुन्या निवृत्ती वेतन योजनेच्या मागणीबाबत नेमलेल्या समितीचा अहवाल मुख्य सचिवांकडे सादर केला आहे. सचिवांचा अहवाल लवकरच मिळेल. राज्य सरकार जुन्या निवृत्तीवेतन योजनेच्या मागणीबाबत सकारात्मक असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

१६ डिसेंबरला वर्धा येथे होणार सकल ओबीसी भटके विमुक्तांची एल्गार सभा

विदर्भातील विविध ओबीसी संघटनाचा ना छगन भुजबळ याच्या भूमिकेला जाहीर समर्थन

गोंदिया – ओबीसी भटके विमुक्त समाजाचे आरक्षण वाचविण्यासाठी,तसेच ओबीसींमध्ये मागच्या दाराने नियमबाह्य होणारी घुसखोरी रोखण्यासाठी, संपुर्ण महाराष्ट्रात ओबीसी समाजाची लोक चळवळ व आंदोलने सुरू झालेली आहेत.त्याच अनुषंगाने वर्धा येथे शनिवार दिनांक १६ डिसेंबरला दुपारी ११ वाजता लोक महाविद्यालयाच्या ग्राऊंडवर सकल ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार सभेचे आयोजन केलेले आहे. या सभेला ओबीसी व बहुजनांचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ हे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच त्यांचे सोबत,ओबीसी जनमोर्चा अध्यक्ष प्रकाश अण्णा शेंडगे, माजी मंत्री. महादेवरावजी जानकर, खासदार रामदासजी तडस, आमदार गोपीचंदजी पडळकर,ओबीसी मुस्लीम नेते शब्बीर अन्सारी,लक्ष्मण हाके, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ.बबनराव तायवडे, लक्ष्मणराव गायकवाड,व इतर ओबीसी नेते सुध्दा मार्गदर्शन करणार आहे.या एल्गार सभेच्या आयोजनासह ओबीसी नेते छगनराव भुजबळ यांच्या भूमिकेला समर्थन देण्याकरीता पूर्व विदर्भातील ओबीसी संघटनेच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रविवार १० डिसेंबराल रविभवन नागपूर येथे ओबीसीचे राष्ट्रीय नेते नामदार छगनराव भुजबळ यांची भेट घेऊन १६ डिसेंबर वर्धा येथे होऊ घातलेला ओबीसी एल्गार महा मेळाव्याकरीता समर्थन जाहीर केले. तसेच आगामी काळात भुजबळ जी भूमिका घेतील त्याचे समर्थन करीत भविष्यात विदर्भातील तरुण ओबीसी कार्यकर्ते भुजबळाच्या पाठीशी उभे राहतील असा संकल्प केला. तसेच वर्धा येथे होणाऱ्या एल्गार सभेला संपूर्ण ताकतीनिशी विदर्भातील कार्यकर्ते उपस्थित राहतील अशी ग्वाही दिली.

आज ओबीसीचे आरक्षणावर अतिक्रमण होवुन ते धोक्यात आलेले आहे. राज्य शासनावर विविध प्रकारे दबाव टाकुन, धमक्या देवुन, ओबीसी आरक्षणात मागच्या दाराने घुसण्याचे प्रगल्भ समाजाचे नियोजित प्रकारे षडयंत्र सुरू आहे.

म्हणुन ओबीसींचे आरक्षण वाचविण्यासाठी, आपल्या नव्या पिढीच्या भवितव्यासाठी, व राज्य सरकारला जाब विचारण्यासाठी, वर्धा येथील ओबीसी भटके विमुक्त एल्गार सभेसाठी, लाखोंच्या संखेने उपस्थित रहावे, असे आवाहन सकल ओबीसी भटके विमुक्त समाजाचे वतीने ओबीसी संघर्ष कृती समिती जिल्हाध्यक्ष बबलू कटरे,ओबीसी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.बी.एम.करमकर,ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे,अशोक लंजे,कैलास भेलावे,सावन कटरे,विनायक येडेवार,राजीव ठकरेले,रवी अंबुले,पी.डी.चव्हाण,एस.यु.वंजारी,भुमेश शेंडे,भुमेश ठाकरे,रघुपती अगडे,हरिष ब्राम्हणकर,प्रेमलाल साठवणे आदीसह व विविध ओबीसी भटके विमुक्त संघटनांनी केले आहे.

पीएचडी करून पोरं काय दिवे लावणार?

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं सभागृहात धक्कादायक विधान

नागपूर : सारथी संस्थेच्या माध्यमातून मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा दिल्या जातात. यातच पीएचडी करण्यासाठी शिष्यवृत्तीसुद्धा दिली जाते. मात्र, ती केवळ २०० विद्यार्थ्यांना दिली जाते. ही संख्या वाढविण्यात यावी, अशी मागणी काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी विधान परिषदेत केली. यावर, राज्यात होत असलेल्या पीएचडींपैकी खरंच किती पीएचडींची आपल्याला गरज आहे? संख्या वाढवून काय करणार? पीएचडी करून पोरं काय दिवे लावणार? असं धक्कादायक विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भर सभागृहात केल्याने विरोधकांकडून आश्चर्य व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे पी.एचडी करणाऱ्या उमेदवारांकडून अजित पवार यांच्या वक्तव्याचा धिक्कार केला जातोय.याबाबत रणजितसिंह मोहिते पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न विचारला होता. त्यावर सुरू असलेल्या चर्चेत बंटी पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना अजित पवार यांनी राज्यातील पीएचडी आणि त्याची उपयुक्तता यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

यावेळी अजित पवार म्हणाले, ङ्गसंस्थेच्या माध्यमातून मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सुविधा पुरविल्या जातात. त्यासाठी २७ जिल्ह्यांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या असून उर्वरित जिल्ह्यांमध्येही लवकरच त्या प्रकाशित केल्या जातील. सुरुवातीला २०० हून अधिक विद्यार्थ्यांना पीएचडीची शिष्यवृत्ती दिली जाईल असे ठरले होते. मात्र, राज्यात होत असलेल्या पीएचडी आणि त्यांची राज्याला, समाजाला व शैक्षणिक क्षेत्रातील एकूणच उपयुक्तता याचा अभ्यास राज्य सरकारद्वारे करण्यात आला. त्यानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेत एक समिती नेमण्यात आली. ही समिती आता हे निर्णय घेते. सदस्यांची आग्रहाची भूमिका लक्षात घेता ही शिफारस समितीकडे केली जाईल. मात्र, ती मान्य होईलच याची खात्री नाही. पीएचडी करून पोरं काय दिवे लावणार?ङ्ग

पीएचडीचा त्या व्यक्तीला वैयक्तिक, राज्याला तसेच समाजाला किती उपयोग होतो आहे याचा अभ्यास करण्यात आला. आजकाल कोणत्याही विषयांवर पीएचडी केली जातेय. त्यानुसार २०० चा आकडा निश्चित करण्यात आला, असे पवारांनी सांगितले.

कोहमारा-गोरेगाव राज्य महामार्गाच्या रूंदीकरणाची वाट

सडक-अर्जुनी: राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ लागून असलेल्या कोहमारा-गोरेगाव या मार्गाच्या रुंदीकरणाची मागणी गेल्या अनेक वर्षांपसून रेटून धरली जात आहे. मात्र लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे गेल्या ३ वर्षापासून मार्गाचे काम थंड बस्त्यात पडले आहे.

अर्जुनी-मोरगाव, देवरी, सडक-अर्जुनी तालुक्यातील नागरिकांना कोहमारा-गोंदिया या मार्गाने गोंदिया येथे कामाने ये-जा करावी लागते. या मार्गाने नागरिकांची वर्दळ वाढल्यामुळे अपघाताचे प्रमाणसुद्धा वाढले आहे. गेल्या दोन दिवसांपुर्वी भुसारीटोला गावाजवळ ३ लोकांना आपला जीव गमवावा लागला. अरुंद मार्ग व त्यावर खड्डे पडल्याने वाहन चालवणे फार कठीण झाले आहे. डव्वा गावाजवळ अरुंद पूल असल्यामुळे गेल्या १ वर्षांपुर्वी ४ माणसांना त्या पुलात ट्रॅक्टर पडल्याने जीव गमवावा लागला. अशा एक ना अनेक घटना या मार्गावर घडलेल्या आहेत. त्यासाठी मार्गाचे रूंदीकरण करणे अति गरजेचे झाले आहे. दुचाकी चारचाकी वाहनांना ओव्हरटेक करणे, वाहन चालविणे तारेवरची कसरत ठरत आहे. कोहमारा-गोंदिया मार्गातील काही ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा मुरुम न भरल्यामुळे गाडी रस्त्याखाली उतरुन अपघात होणे आता नित्याचीच बाब झाली आहे. या मार्गावरील सडक-अर्जुनी, वडेगाव, परसोडी, खजरी, डव्वा, पाटेकुर्रा, मुरदोली आदी गावातील रस्ते फार अरुंद असल्यामुळे प्रवाशांना ये-जा करणे कठिण झाले आहे. याच मार्गावर काही ठिकाणी खड्डे पडल्यामुळे वाहनांना खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात अपघातही झाले आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देून खजरी, पाटेकुर्रा, वडेगाव, परसोडी, भुसारीटोला आदी परिसरात पडलेले खड्डे बुजविण्याची नितांत गरज आहे. मार्गावर नेहमीच अपघात होऊन काहींना जीवही गमवावा लागला. अशा घटना घडत असल्याने याकडे कुणी लोकप्रतिनिधींनी लक्ष देतील का? असा सवाल आहे.

क्रेडिट कार्डवर लोन काढायचे अनं गंडवायचे, टोळीला अटक

गोंदिया : क्रेडिट कार्डवर लोन मिळवून देण्याच्या नावावर बनावट कागदपत्रे तयार करून ७ लाखांचे लोन घेऊन ७० टक्के रक्कम आपल्या खात्यावर वळवून फसवणूक करणा?या टोळीचा पर्दाफाश आर्थिक गुन्हे शाखा, सायबर सेलने केला आहे.या प्रकरणात सहा आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ७ डिसेंबर रोजी करण्यात आली. सडक-अर्जुनी तालुक्यातील खाडीपार येथील होमगार्ड धनराज पुंडलिक सयाम (३०) यांना ऑक्टोबर २०२३ मध्ये क्रेडिट कार्डवर ७ लाख रुपयांचे लोन मिळवून देण्यासाठी त्यांच्या नावाने बनावट कागदपत्र तयार केले.

पर्यटनाच्या दृष्टीने गोंदिया जिल्हा समृद्ध, पण नियोजनाचा अभाव

खेमेंद्र कटरे

गोंदिया – मागास नक्षलग्रस्त जिल्ह्यातील पर्यटनस्थळांना सुध्दा शासन दरबारी पाहिजे ते स्थान व त्या पर्यटनस्थळांची मार्किटिंग करण्यात राज्यसरकारच्या विभागासह जिल्हाप्रशासनला अपयश आले.आज कोकणालाही लाजवेल अशा वनवैभव आणि अनेक अशी दुर्लक्षित स्थळे असूनही पर्यटन जिल्ह्यांच्या यादीत गोंदियाचा समावेश नाही.नव्याने तयार झालेल्या नवेगाव न्यु नागझिरा व्याघ्रप्रकल्पाला पाहिजे तशी प्रसध्दी अद्यापही न मिळाल्याने पर्यटक ताडोबा व कान्हाकेसरीकडेच जातांना दिसून येतो. जिल्ह्यातील पर्यटनस्थळाकडे बघितल्यास सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेसोबतच निसर्गरम्य पर्यटनाचा आस्वाद या घेता येऊ शकतो.विशेष म्हणजे मोठ मोठी उद्योजक मंडळी गोंदियाच्याच विमानतळावर खासगी विमानाने येऊन कान्हा केसरीला जातात.परंतु त्या उद्योजक पर्यटकांना आपण आपल्या नागझिरा,गोठणगावकडे वळवू शकलो नाही.

काही वर्षापूर्वी नवेगावबांध येथील राष्ट्रीय उद्यानातील प्राणीसंग्रहालय वन्यजीव विभागाची व पर्यावरण मंत्रालयाची परवानगी नसल्याने मोडकळीस आल्यानंतर तेथील पर्यटकांचा ओघही कमी झालेला आहे.हिवाळ्यात या ठिकाणी स्थलांतरित पक्ष्यांची गदी असते. युरोपियन डक, पीनटेक, ब्राम्हणी डक, कॉमन कुट, शेकाव्या गार्गनी, गडनाल, मलार्ड, स्पारुविल डक, कॉमन टील, रेडकेस्टेड, पोचार्ड, टफडेल डक, ग्रेलॅज गूज या पक्ष्यांचे थवेच्या थवे येतात. विदर्भातील पक्षीमित्रांसाठी ही पर्वणी असते. त्यांचा प्रयत्नही असतो, मात्र प्रवाशांसाठी कुठलीही सोय नसल्याने पर्यटक येण्यासाठी टाळतात. यात मात्र नुकसान होत आहे हे जिल्ह्याचेच. नागझिरा व नवेगावबांध ही स्थळे वन्यजीव व वनविभागाच्या अधीन आहेत. जोपर्यंत हे दोन्ही विभाग यासंदर्भात पुढाकार घेत नाही तोपर्यंत जिल्ह्याला लाभ मिळणार नाही. यासाठी या विभागाने पुढाकार घेण्याची गरज आहे.

जिल्ह्यात पर्यटन व्यवसायाला चांगली संधी असून नैसर्गिक,इतिहासीक स्थळांचा जिल्हा आहे.या जिल्ह्यात ६० च्या जवळपास चांगले स्थळ पर्यटनासाठी उपयुक्त आहेत..त्यापैकी २८ जागांवर पर्यटक आजही येत आहेत.त्या जागांवर पर्यटक सुविधा वाढविण्याच्या दृष्टीने २०१३ मध्ये तयार केलेल्या एका प्रोजेक्टनुसार ९४२२.६ लाख रुपयाचे नियोजन प्रस्तावित करण्यात आले होते.त्यातच २०३३ मध्ये २३ लाख पर्यटक या स्थानावर येतील आणि त्याम ाध्यमातून १ लाख १५ रोजगार २० पर्यटकामागे १ व्यक्ती पकडून लक्ष ठेवण्यात आले होते.त्या प्रोजेक्टनुसार १० वर्ष तर निघाले आहेत,मात्र त्याची साधी अमलबजावणी सुध्दा झालेली नाही.

जिल्ह्याला नैसर्गिक समृध्दीचा वारसा लाभल्याने जिल्ह्यात नागझिरा अभयारण्य व नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान यांसारखे प्रकल्प तयार करण्यात आले. त्यामुळे नैसर्गिक पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी दरवषी हजारोच्या संख्येने पर्यटक जिल्ह्यात येत असतात. गोंदिया जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने समृद्ध असल्याचे दिसत आहे. शासनाने जिल्ह्यात पर्यटनाला चालना दिल्यास नैसर्गिक साधनातूनच जिल्ह्याचा विकास व रोजगाराच्या समस्या मागी लागेल हे निश्चित.गोंदिया जिल्ह्याला निसर्गाचं लेणं लाभलेलं आहे. आजघडीला जवळपास ३० टक्के क्षेत्र हे वनांनी आच्छादीत आहे. जिल्ह्यात नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान व नागझिरा व्याघ्र प्रकल्प,हॉजराफॉल, बोदलकसा,इटियाडोह,तिबेटीयन कॅम्प,कचारगड गुफा यांसारखे पर्यटनाचे चांगले स्थळ असल्याने येथे दरवषी हजारो पर्यटक येत असतात. नैसर्गिक पर्यटनाचा व वन्यजीव बघण्याचा आनंद लुटण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या सातत्याने वाढतच आहे.

पर्यटकांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळूनही शासन जिल्ह्याचे पर्यटन धोरण राबविण्यास अपयशी ठरत आहे. शासनाने येथील नैसर्गिकतेचा वापर पर्यटनाच्या दृष्टीने केल्यास जिल्ह्याच्या विकासासोबत रोजगाराची समस्या देखील मागी लागू शकते.

सालेकसा या नक्षलग्रस्त व आदिवासी तालुक्याला लाभलेले वनवैभव आणि सांस्कृतिक वारसासोबतच पर्यटनस्थळामुळे या तालुक्याचे नाव शेजारील राज्यातच नव्हे तर विदेशापर्यंत पोचले आहे.परंतु दरेकसा जवळील आदिवासी समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या कचारगड गुफाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे हे स्थळ विकसीत होऊ शकले नाही.याउलट पर्यटनस्थळाच्या विकासाच्या नावावर आजपर्यंत कितीकरी कोट्यावधीचा निधी खर्च झाला मात्र विकास सोयी सुविधांचा अभाव व गुहेतील स्वच्छतेकडे असलेल्या दुर्लक्षामुळे हे पर्यटनस्थळ फक्त फेबुवारीत ४ दिवसाकरीताच महत्वाचे ठरते.

गुहेच्या शेजारी एमटीडीसी किंवा वन्यजीव विभागाने छोटेखानी आदिवासी समाजाचे सांस्कृतिक मार्गदर्शन केंद्र व उपहारगृह उभारल्यास,देशातील कोपर्यातून येणार्या आदिवासी बांधवाना चांगला लाभ होऊ शकतो. कोट्यावधीचा निधी जरी या स्थळाकडे जाण्यासाठी खर्च झाला असला तरी गुफेतील स्वच्छता आणि त्या गुफेच्या देखरेखीकडे सातत्य नसल्याने आशिया खंडातील ही गुफा आजच्या घडीला काही दिवस वगळल्यास अस्वच्छतेचे माहेरघर असते.त्यामुले येथे येणारा पर्यटक हा पुन्हा येण्याची इच्छा व्यक्त करीत नाही.

याठिकाणी तज्ञ गाईड. आणि केंद्र पर्यटन विभागाने न सुरु केल्याने त्याचाही फटका बसतो.याठिकाणी रोपवेसह अनेक सुविधांच्या माध्यमातून पर्यटकांना पर्यटनाची संधी आहे.हॉजराफॉल हे पर्यटन स्थळ हंगामी स्वरुपात असून याठिकाणी काही प्रमाणात स्थानिक वनव्यवस्थापन समितीच्यामाध्यमातून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सुविधा उभारल्या गेल्या आहेत.या भागात रात्रीच्या पर्यटनाला संधी आहे,त्याकडे जिल्हा प्रशासनाने केलेला दुर्लक्ष आणि नक्षलवाद्याच्या नावावर दाखविण्यात येणारी भिती ही या पर्यटनस्थळाच्या विकासाला बाधा ठरली आहे.

संपादकीय

काश्मीरबाबत निकाल; देशाला वरदान

श्रीनगर असो, जम्मू की लडाख, एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे स्थानिकांमध्ये असलेली पर्यटकांविषयीची आपुलकी आणि जिव्हाळा. "जम्मू-काश्मीर' हे भारतातील एकमेव राज्य असेल जिथे "पर्यटन' हा बारमाही चालणारा व्यवसाय आहे. जगप्रसिद्ध दल सरोवर, डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या मुघलकालीन बागा, बर्फाच्छादित पर्वतशिखरे याची भुरळ पडणारी ठिकाणं. अशा नितांतसुंदर निसर्ग, शांततेची अनुभूती देणारी खोरी, भव्य डोंगर कलाकारांना आणि साहसीवीरांना पिढ्यान-पिढ्या साद घालणारी अनेक ठिकाणे पाहायला मिळतात. जिथे उदात्तता आणि अलौकिकता यांचा संगम होतो, जिथे हिमालय आकाशाला गवसणी घालतो आणि सरोवरे आणि नद्यांचे निखळ पाणी स्वर्ग प्रतिबिंबित करतात. अशा भारताचे नंदनवन असलेल्या ठिकाणी मात्र गेल्या सात दशकांपासून हिंसाचाराचे उग्र रूप आणि अस्थैर्य अनुभवायला मिळत आहे, हेही कटू सत्य आहे.

काश्मीर हा जगाच्या नकाशावर भारतात असला तरीही ते भारतात आहे की नाही, असा गोंधळात घालणारा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जात होता. भारतीय राज्य घटनेने दिलेल्या अधिकारानुसार भारतातील कोणत्याही भागातील नागरिक देशात कुठेही कायमस्वरूपी वास्तव करू शकतो. मात्र त्याला काश्मीरचा त्याला अपवाद होता. काश्मीर प्रांतात जमीन खरेदी करता येत नव्हती. त्यामुळे या ठिकाणी तो स्थायिक होऊ शकत नव्हता. आता सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे जन्मू आणि काश्मीरसाठी तात्पुरत्या स्वरूपात असलेले कलम ३७० आणि ३५ ए ही कलमे रद्द करण्यात आले आहे. केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी घटनात्मक एकात्मता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने घेतलेला निर्णय काल सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरला. जम्मू-काश्मीर हा भारताचा भाग असला तरी पाकिस्तानची निर्मिती झाल्यापासून हा निसर्गाचे वरदान असलेला प्रदेश आपलाच आहे, असा दावा पाकिस्तानकडून वारंवार केला गेला आहे. त्यातून आजही सीमाभागात धुमश्चक्री होते. येथील बहुसंख्य वस्ती मुस्लीम असल्याने या प्रातांत राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना आपलेसे करण्याचा प्रयत्न पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांकडून केला गेला. त्यामुळे, हिंसेचे गालबोल या प्रदेशाला लागलेले आहे. तो आजही मूठभर टोळक्यांच्या माध्यमातून सुरू आहे.

१९४७-१९४८च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर, जम्मू आणि काश्मीरचे संस्थान भारत (जम्मू, काश्मीर खोरे आणि लडाखचे क्षेत्र नियंत्रित करणारे) आणि पाकिस्तान (ज्याचे गिलगिट-बाल्टिस्तान आणि आझाद काश्मीर नियंत्रित होते) यांच्यात विभागले गेले. महाराजा हरी सिंग यांनी पाकिस्तानी आदिवासींनी केलेल्या आक्रमणानंतर २६ ऑक्टोबर १९४७ रोजी इन्स्ट्रुमेंट ऑफ एक्सेशनवर स्वाक्षरी केली. मार्च १९४८ मध्ये महाराजा हरी सिंग यांनी अंतरिम सरकारचा एक भाग म्हणून शेख अब्दुल्ला यांची जम्मू आणि काश्मीरचे प्रमुख पदावर नियुक्ती केली होती. भारतीय संविधान सभेने कलम ३०६-ए नावाच्या तरतुदीचा मसुदा तयार केला, जो नंतर अनुच्छेद ३७० झाला होता. ऑक्टोबर १९५१ मध्ये राज्यासाठी नवीन संविधान तयार करण्यासाठी जम्मू आणि काश्मीरसाठी एक संविधान सभा बोलावण्यात आली होती, ज्या निवडणुकीमध्ये अब्दुल्ला यांच्या जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स पक्षाने सर्व जागा जिंकल्या होत्या.

अब्दुल्ला यांनी २४ जुलै १९५२ रोजी भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्याशी "दिल्ली करार' नावाचा करार केला. त्यात भारताच्या राज्यघटनेच्या अधिकार क्षेत्राव्यतिरिक्त नागरिकत्व आणि राज्याच्या मूलभूत अधिकारांबाबतच्या तरतुदींचा विस्तार करण्यात आला. अब्दुल्ला यांनी मात्र कलम ३७० कायमस्वरूपी बनवण्याचा प्रयत्न केला आणि भारतापासून राज्य वेगळे करण्याची मागणीही त्यांनी केली होती. या प्रकरणात १९५३ मध्ये त्यांची अटक झाली होती. त्यामुळे अब्दुला यांच्यासारख्या स्थानिक राज्यकर्त्यांनी काश्मीर जनतेच्या मनात आपण भारतापासून वेगळे आहोत, ही भावना बिंबविण्याचा प्रयत्न केला. केंद्रातील तत्कालीन काँग्रेस सरकारच्या बोटचेपी धोरणामुळे, काश्मीर हा एका राजकीय आणि सामाजिक प्रश्न बनला होता.

नेहरूमंत्रिमंडळात डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी हे महत्त्वाचे खाते संभाळत होते आणि काश्मीर मुद्द्यावर ते मंत्रिमंडळातून बाहेर पडले आणि त्यांनी पुढचा खडतर मार्ग स्वीकारला, जो त्यांच्या जीवावर बेतला. त्यांचे प्रयत्न आणि त्याग यामुळे काश्मीर मुद्दा कोट्यवधी भारतीयांशी भावनिकदृष्ट्या जोडला गेला होता. २०१४ साली केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार आल्यानंतर, ऑगस्ट २०१९ साली काश्मीर प्रातांतील कलम ३७० हटविण्याचा जो धाडसी निर्णय घेण्यात आला होता. त्याचे देशातील तमाम जनतेने स्वागत केले. मात्र काश्मीरच्या स्वतंत्र अस्तित्वावर गदा आणली, असा त्रागा करत काही मंडळी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी गेली होती. त्यावर पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने निकाल देताना स्पष्ट केले की, काश्मीरचा समावेश भारतीय संघराज्यात करतेवेळी राज्याला अंतर्गत स्वायत्तता नव्हती. "राज्यघटना सर्वोच्च असेल हे काश्मीरच्या महाराजांनी प्रतिज्ञापत्रात मान्य केले आहे. तसेच घटनात्मक व्यवस्थेमध्ये जम्मू-काश्मीरला स्वायत्तता असल्याचा कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. खुद्द जम्मू-काश्मीरच्या घटनेमध्येही स्वायत्ततेसंदर्भात कोणताही उल्लेख नाही", असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी निकालात नमूद केले आहे. "जम्मू-काश्मीरला इतर राज्यांपेक्षा वेगळी अशी कोणतीही अंतर्गत स्वायत्तता नाही", यावर सर्वोच्च न्यायालयाने निकालातून अधोरेखित केले आहे. त्यामुळे भविष्यात भारतीय नागरिकांसाठी काश्मीर हे वरदान ठरणार आहे.

खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमाने विद्यार्थ्यांचा बौध्दीक व शारीरिक विकास:- रचनाताई गहाणे

अर्जुनी मोर. - प्राथमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अनमोल क्षण आहे.गुणवंत आणी प्रज्ञावंत आणी सुसंस्कारीत विद्यार्थी घडविण्याचे कार्य इयत्ता १ ते ८ पर्यंत च असते.शालेय शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचा बौध्दीक व शारीरिक विकास घडविण्यासाठी खेळ व सांस्कृतिक कार्यक्रम महत्वाचे आहे. असे प्रतिपादन भाजपा प्रदेश महिला मोर्चा च्या महामंत्री तथा जिल्हा परिषद सदस्या रचनाताई गहाणे यांनी व्यक्त केले.

अटल जिल्हा क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रम ांतर्गत बीट नवेगाव बांध येथे आयोजित बीटस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनाप्रसंगी उदघाटक म्हणून रचना गहाणे बोलत होत्या. उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद गोंदियाचे उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती यशवंत गणवीर होते. प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समितीचे उपसभापती होमराज पुस्तोडे, पंचायत समिती सदस्य पुष्पलता दुर्गकर, पोलीस निरीक्षक पांढरे , नवेगावबांधचे नितीन पुगलीया, बाकटी च्या सरपंच सरिता राजगिरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय डोये, धनंजय डोंगरवार, उपाध्यक्ष अमित सरजारे, ग्राम पंचायत सदस्य दिलीप शिपानी, पूजा कापगते, शितलबाई राऊत ,खुशाल काशीवार ,करचाल सर, काशीवार सर, व अन्य मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते नवेगावबांध बीट अंतर्गत नवेगाव बांध चान्ना, बाकटी, पवनी /धाबे, झासीनगर या केंद्रातील एकूण ३४ शाळा समाविष्ट आहेत.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

विधानपरिषद शतकमहोत्सव आणि नागपूर हिवाळी अधिवेशनांचे योगदान

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतकमहोत्सवानिमित्त हिवाळी अधिवेशन, २०२३ चे औचित्य साधून दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ९ ते ११ यावेळेत विधानपरिषद सभागृह, नागपूर येथे विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. "महाराष्ट्र विधिमंडळ संसदीय वाटचालीत हिवाळी अधिवेशनाचे महत्त्वपूर्ण योगदान" या विषयावरील चर्चासत्राच्या माध्यमातून गत हिवाळी अधिवेशनांमधील महत्त्वपूर्ण संमत विधेयके, ठराव, चर्चा, प्रस्ताव आणि त्यानुषंगाने घेण्यात आलेले निर्णय यांचे संदर्भ नव्याने अधोरेखित होणार आहेत. भारतातील संसदीय लोकशाहीत केंद्रस्तरावर लोकसभा आणि राज्यसभा ही द्विसभागृह पद्धती स्वीकारण्यात आली असली तरी राज्यस्तरावर ६ राज्यांचा अपवाद वगळता सर्व राज्यांमध्ये विधानपरिषद हे दुसरे सभागृह अस्तित्वात नाही. महाराष्ट्र विधानपरिषदेने गत शंभर वर्षाच्या कालकसोटीवर आपली उपयुक्तता आणि महत्व सिद्ध केले असून एरव्ही राजकीय परीघात येण्याची शक्यता नसलेल्या विद्वतजनांचा संसदीय सहभाग विधानपरिषदेमुळे शक्य झाला.

देशातील संसदीय लोकशाहीच्या संदर्भात द्विसभागृह व्यवस्थेत महाराष्ट्र विधानपरिषदेने उल्लेखनीय योगदान देत आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविला आहे. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड शिफारशीनुसार भारत सरकार अधिनियम १९१९ अन्वये "Bombay Legislative Council" ची प्रारंभिक बैठक १९ फेब्रुवारी, १९२१ रोजी टाऊन हॉल मुंबई येथे झाली. श्री. नारायण गणेश चंदावरकर यांची विधानपरिषदेच्या सभापतीपदी झालेली नियुक्ती ही एक ऐतिहासिक घटना होती. सन १८६२ ते सन १९२० पर्यंत Governor of Bombay यांच्या अध्यक्षतेखाली Council चे कामकाज चालत होते. सन १९२१ मध्ये श्री. नारायण चंदावरकर यांच्या रुपाने पहिल्यांदा भारतीय व्यक्तीची सभापती म्हणून नियुक्ती झाली. अतः सन १९२१ ते २०२१ हा महाराष्ट्र विधानपरिषद शतकपूर्तीचा कालखंड मानता येईल. भारताच्या घटनात्मक इतिहासातील १९१९-१९२०-२१ नंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९३५ चा भारत सरकार कायदा (Government of India Act १९३५) होय. या कायद्याद्वारे संघराज्यात्मक शासन पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. या कायद्यान्वये विधानसभा आणि विधानपरिषद असे नामाभिदान देऊन मुंबई प्रांतात १९३७ मध्ये दोन सभागृहे अस्तित्वात आली.

दिग्गज सदस्यांची मालिका

विधानपरिषदेचा आरंभबिंदू ठरवायचा झाले तर आपल्याला शंभर पेक्षाही जास्त वर्षे मागे जावे लागेल. २२ जानेवारी, १८६२ रोजी मुंबई येथील टाऊन हॉलच्या दरबार हॉलमध्ये भूतपूर्व मुंबई प्रातांच्या लेजिस्लेटीव्ह कौन्सिलची (Council of Governor of Bombay) पहिली बैठक भरली होती. १८६२ ते १९३७ या पंच्याहत्तर वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत -

सर्वश्री जगन्नाथ शंकर शेठ, जमशेटजी जीजीभॉय, सर माधवराव विंचूरकर, रावसाहेब विश्वनाथ, नारायण मंडलिक, रावबहादूर गोपाळ हरी देशमुख ऊफ ' लोकहितवादी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, सर फिरोजशाह मेहता, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ कृष्ण गोखले, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, नारायण गणेश चंदावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी दिग्गज सन्माननीय सदस्यांची मालिका विधिमंडळाला लाभली आहे. तेव्हापासून १९२१ चा संदर्भ पुढे नेत आजही विधानपरिषद कार्यरत आहे, उल्लेखनीय योगदान देत आहे. केवळ राज्यातील नव्हे तर देशातील ते एक सर्वाधिक जुने सभागृह आहे, ज्याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे.

वरिष्ठ सभागृह पद्धतीवरील टीका एकांगी

विधानसभा हे सभागृह लोकांनी थेट निवडून दिलेल्या सदस्यांद्वारे तयार होत असल्याने तेच जनतेचे खरेखुरे प्रतिनिधी ठरतात. त्यामुळे मग विधानपरिषद या सभागृहाची गरजच काय? विधानपरिषद हे सभागृह असावे की, असू नये, असा प्रश्न, असे वादविवाद अधूनमधून उपस्थित केले जात असतातच. "मागल्या दाराने प्रवेश", "राजकीय सोय लावण्याचा उपाय" असे अनेक प्रवाद विधानपरिषद नामनियुक्त सदस्यत्वासंदर्भात जोडले गेले आहेत तर विधानपरिषदेच्या एकूणच अस्तित्वाच्या विरोधात मतप्रदर्शन करणारा गट नेहमीच विधानपरिषदेच्या बाबतीत "वेळकाढूपणाचे सभागृह", "कायदयाचा किस पाडणारे सभागृह", "खर्चिक प्रणाली" अशी मल्लिनाथी करीतच असतो. परंतु या गोष्टी, यासंदर्भातील टीका ही एकांगी स्वरुपाची आहे. वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी आहे. पूर्ण विचारांती या प्रश्नाकडे बघितल्यास लोकशाही संवर्धन व बळकटीसाठी विधानपरिषद किंवा द्विसभागृह पध्दती ही एक आवश्यक अशी संकल्पना आहे, असेच म्हणावे लागेल. It is a 'Revising Chamber' and not a 'Delaying Chamber'- असे माजी सभापती श्री. जयंतराव टिळक यांनी म्हटले आहे ते अगदी योग्यच होय.

संसदीय लोकशाहीत निर्णय प्रक्रियेअगोदर सखोल विचारमंथनाला महत्व आहे. Decision out of Discussion is Important. त्याचप्रमाणे कोणत्याही धोरणात्मक निर्णयापर्यंत पोहचताना त्यासंदर्भातील सर्व मतमतांतरांचा परामर्श घेतला जाणे आवश्यक असते. Diverse views must be acknowlegded. विधानपरिषद या दुसऱ्या सभागृहाच्या अस्तित्वामुळे ही गरज पूर्ण होऊ शकते. महाराष्ट्र विधानपरिषदेने आजवरच्या वाटचालीत यादृष्टीने उल्लेखनीय योगदान देत आपली आवश्यकता अधोरेखित केली आहे आणि त्यात नागपूर अधिवेशनांचे महत्वपूर्ण संदर्भ, कामकाज यांचा उल्लेख आवर्जुन करावा लागेल.

हिवाळी अधिवेशनांत महत्वपूर्ण कामकाज...

राज्यातील सहकाराचा पाया विस्तृत आणि भक्कम करून ग्रामीण भागात समृध्दीचे वारे खेळविणारा महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा तत्कालीन सहकार मंत्री श्री. बाळासाहेब भारदे यांनी डिसेंबर, १९६० नागपूर हिवाळी अधिवेशनात मांडला आणि याच अधिवेशनात विस्तृत चर्चेअंती तो संमत झाला. मा.श्री. भारदे साहेब पुढे १९६२ ते १९७२ असे दोन टर्म विधानसभा अध्यक्ष राहिले होते. जिल्हापरिषद व पंचायत समिती विधेयक माहे डिसेंबर, १९६१, शिक्षण क्षेत्रातील बाबींसंदर्भात श्वेतपत्रिकेवर चर्चा माहे नोव्हेंबर, १९६८, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ कायदा माहे डिसेंबर, १९६८, विदर्भ-कोकण-मराठवाडा यांच्यासाठी स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळ स्थापन करण्यासंदर्भातील महत्वपूर्ण अशासकीय ठरावे माहे नोव्हेंबर, १९६९, हरिजनांवर होणाऱ्या अत्याचाराची मीमांसा



करण्यासाठी व त्यावर उपाययोना सुचविण्यासाठी समिती नेमण्याचा निर्णय - श्री. वि.स.पागे समितीचे गठन माहे डिसेंबर, १९७२, पंढरपूर मंदिरे विधेयक माहे नोव्हेंबर, १९७३, प्राणी रक्षण विधेयक माहे डिसेंबर, १९७६, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आरक्षण विधेयक - पदोन्नतीतील आरक्षण विधेयक माहे डिसेंबर, २००२, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग विधेयक माहे डिसेंबर, २००५, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण विधेयक माहे डिसेंबर, २००८, प्रदीर्घ चर्चा आणि छाननी अंती संमत करण्यात आलेले महत्त्वपूर्ण असे अंधश्रद्धा निर्मुलन विधेयक माहे डिसेंबर, २०१३ असे नागपूर अधिवेशनांमधील संमत विधेयकांचे महत्त्वपूर्ण योगदान आपल्या डोळ्यासमोर आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राबविण्यात आलेली कापूस एकाधिकार खरेदी योजना तसेच रोजगार हमी योजना अशाच मूलगामी चर्चा आणि विचारमंथनांचे फलित आहे. यावेळी या विधेयकांमधील विधानपरिषदेतील चर्चा, सुचविलेल्या सुधारणा उल्लेखनीय ठरले आहे. त्याचप्रमाणे सन १९६० ते २०२३ या कालखंडात महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये अनेक महत्वपूर्ण शासकीय ठराव संमत करण्यात आले.

सामंजस्य आणि सहमतीचे दर्शन

आजपर्यंत नागपूर येथील अधिवेशने ही विदर्भातील प्रश्नांबरोबरच राज्यातील महत्वाचे प्रश्न, ध्येयधोरणे, संमत कायदे यादृष्टीने नेहमीच महत्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहेत. कृष्णा-गोदावरी पाण्याच्या वाटपासंबंधातील ठराव, लोकसभेत व विधानसभेत सरळ निवडणुकीने भरल्या जाणाऱ्या एकूण जागांच्या एक तृतीयांशपेक्षा कमी नाही एवढया जागा महिलांसाठी आरक्षित करण्याबाबतचा प्रस्ताव, वनसंवर्धन कायदा, मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम १९९४ मध्ये सुधारणा करणारा ठराव, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यासाठी घटनेत सुधारणा करण्याबाबत, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी मा.अध्यक्षांनी सर्व गटनेत्यांची बैठक घेऊन यासंदर्भात सभागृहाने संमत केलेला ठराव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी एन.टी.सी. च्या मालकीची साडेबारा एकर जागा केंद्र शासनाने देण्याबाबतचा एकमताने संमत झालेला ठराव, छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई चा नामविस्तार "छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई" असे करण्याबाबत केंद्र सरकारला करण्यात आलेली शिफारस एकमताने संमत, त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी टर्मिनसचा "छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस" असा नामविस्तार, एल्फीस्टन रोड या रेल्वे स्थानकाचे नाव बदलून ङ्गप्रभादेवीङ्ग असे करण्यात यावे अशी शिफारस केंद्र सरकारला करण्यात आली. अशा अनेक संदर्भामध्ये नागपूर अधिवेशनात घेण्यात आलेले हे निर्णय, चर्चा महत्वपूर्ण ठरली आहे. या सर्व वेळी सभागृहांमध्ये अतिशय सामंजस्य आणि सहमतीचे दर्शन घडले. महाराष्ट्र, जम्मू - काश्मीर आणि कर्नाटक...

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रसंगी मध्यप्रांतातील मराठी भाषिक विदर्भ प्रदेश महाराष्ट्रात सामील झाला. नागपूरला असलेला तेव्हाच्या राजधानीचा दर्जा त्यागून वैदभीय जनता महाराष्ट्रात सामील झाली.

२८ सप्टेंबर, १९५३ रोजी अस्तित्वात आलेल्या नागपूर करारान्वये "शासनाचे कार्यस्थान अधिकृत निश्चित कालावधीकरीता नागपूर येथे हलविण्यात येईल आणि दरवर्षी राज्य विधानमंडळाचे एक अधिवेशन नागपूर येथे भरविण्यात येईल", असे सुनिश्चित करण्यात आले. अशाप्रकारे दोन ठिकाणी विधीमंडळाचे अधिवेशन गेली अनेक वर्षे भारतात महाराष्ट्र आणि जम्मू आणि काश्मीर या दोन राज्यात आयोजित केली जात आहेत. सन २०१९ मध्ये जम्मू आणि काश्मीर, लडाख केंद्रशाषित प्रदेश झाले आहेत. तसेच कर्नाटकमध्ये सन २०१२ मध्ये बेळगांव येथे सुवर्ण विधानसभा नावाने नवीन इमारत बांधण्यात आली असून तेथे विधानसभेचे हिवाळी अधिवेशन आयोजित केले जाते. नागपूर करारानुसार १९६० पासून उप राजधानी नागपूरमध्ये महाराष्ट्र विधानमंडळाचे एक अधिवेशन नागपूर येथे आयोजित केले जाते. फक्त काही अपवाद वगळता नागपूर कराराव्दारे अंमलात आणली गेलेली ही व्यवस्था अव्याहतपणे सुरु आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर नागपूर येथे घेण्यात न आलेल्या अधिवेशनांची संख्या ६ आहे. त्यांचे वर्ष आणि कारणे पुढीलप्रमाणे

(१) १९६२ - भारत-चीन युध्दामुळे नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही.

(२) १९६३ - तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मारोतराव कन्नमवार यांचे दिनांक २४ नोव्हेंबर, १९६३ रोजी निधन झाल्यामुळे नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही.

(३)१९७९ - लोकसभेच्या निवडणूका जाहीर झाल्यामुळे यावर्षी नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही.

(४) १९८५ - दिनांक २८ डिसेंबर, १८८५ ला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना मुंबई येथे झाली होती. त्याचा शताब्दी महोत्सव मुंबई येथे आयोजित करण्यात आल्याने या वर्षी नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही. मात्र १९८६ साली ३ ऐवजी ४अधिवेशने झाली, त्यापैकी जानेवारी, १९८६ आणि नोव्हेंबर, १९८६ अशी दोन अधिवेशने नागपूरला झाली. या दोन्ही अधिवेशनाच्या बैठकांची संख्या प्रत्येकी १५ दिवस होती.

(५) सन २०२० (६) सन २०२१ - वैश्विक महामारी कोरोना (कोविड-१९) मुळे नागपूर येथे अधिवेशन होऊ शकले नाही.

उपरोक्त सहा अपवाद वगळता १९६० पासून दरवर्षी नित्यनेमाने १ अधिवेशन उपराजधानी नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. त्यात नागपूरातील ४ पावसाळी अधिवेशनांचाही समावेश आहे. (सन १९६१, १९६६, १९७१ आणि अलीकडचे जुलै, २०१८)

बरखास्तीचा ठराव सखोल विचारमंथनाअंती फेटाळला...

महत्वाची बाब म्हणजे नागपुरातील १९६१ च्या पहिल्या पावसाळी अधिवेशनात विधानपरिषद हे ज्येष्ठांचे सभागृह बरखास्त करण्यात यावे असा ठराव विधानसभेत मांडण्यात आला होता आणि त्यावर चर्चाही झाली होती. श्री.स.गो. वटी (वसई), ठाणे यांनी विधानपरिषद बरखास्त करण्यात यावी अशी मागणी करणारा हा ठराव २५ जुलै, १९६१ रोजी विधानसभेत मांडला. ठरावावर बरेच विचारमंथन झाले. हा ठराव ४४ विरुध्द ८४ मतांनी फेटाळण्यात आला. हे कार्यवृत्त जिज्ञासूंनी वाचणे आवश्यक आहे. द्विसभागृह असावे की नसावे आणि असल्यास ते का असावे, यासंदर्भातील सखोल विचारमंथन आपल्याला वाचायला मिळेल. द्विसभागृह पध्दतीसंदर्भातील हा महत्वाचा वैचारिक ठेवा आहे.

भावनिक ऐक्य आणि पीठासीन अधिकारी यांची महत्त्वाची भूमिका

विशाल मराठी भाषिक राज्याची निर्मिती आणि नागपूर करार या संदर्भात बोलतांना प्रथम मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी भावनिक ऐक्याला महत्व दिले होते. नागपूर येथील अधिवशेनाच्या आयोजनासंदर्भात खर्चाचा मुद्दा घेऊन टिका केली जाते परंतु अधिवेशनामुळे भावनिक ऐक्याचा बंध बळकट होणे आणि अधिवेशन काळात विदर्भातील प्रश्नांना न्याय मिळणे, विकास योजनांना गती मिळणे शक्य झाले आहे. नागपूर अधिवेशनात विदर्भाच्या प्रश्नांवर, विकास योजनांवर प्रश्न-लक्षवेधी-ठराव-अर्धा तास चर्चा-अशासकीय ठराव-औचित्याचे मुद्दे-स्थगन प्रस्ताव अशा विविध संसदीय आयुधांव्दारे विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सखोल विचारमंथन झाल्याचे आपल्याला मागील अधिवेशनांच्या कार्यवृत्तावरुन दिसून येईल. दोन्ही सभागृहांचे मा.पीठासीन अधिकारी नागपूर अधिवेशन काळात विदर्भातील प्रश्नांना न्याय मिळावा यासाठी संबंधीत विषयांना, सन्मानीय सदस्यांना अग्रक्रमाने संधी उपलब्ध करुन देत असतात.

नागपूर अधिवेशन आणि राजकीय घडामोडी

नागपूर हिवाळी अधिवेशनांचे महत्त्व सभागृहातील काम काजाइतकेच या दरम्यानच्या सभागृहाबाहेरील राजकीय घडामोडींना देखील तितकेच आहे. ज्येष्ठ नेते श्री. शरदचंद्रजी पवार विधानसभा विरोधी पक्षनेते असतांना मुख्यमंत्री श्री. अ.र.अंतुले सरकारचे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी श्री. पवार यांच्या नेतृत्वाखाली जळगाव ते नागपूर पर्यंत डिसेंबर, १९८० मध्ये काढण्यात आलेली ऐतिहासिक शेतकरी दिंडी, बॅरिस्टर बाबासाहेब भोसले मुख्यमंत्री असतांना त्यांच्या विरोधात झालेले डिसेंबर १९८२ चे बंड, मंत्रीपदी असतांना ज्येष्ठ नेते श्री. सुशिलकुमारजी शिंदे आणि श्री. विलासरावजी देशमुख यांनी डिसेंबर १९९० चे नागपूर हिवाळी अधिवेशन आटोपताच जानेवारी महिन्यात फडकावलेले बंडाचे निशाण, तत्कालीन आक्रमक शिवसेना नेते श्री. छगन भुजबळ यांनी शिवसेना पक्षाला सोडचिठ्ठी देत केलेले डिसेंबर १९९१ चे बंड, त्यामुळे शिवसेनेचे विधानसभेतील संख्याबळ घटल्याने विरोधी पक्षनेतेपद श्री. मनोहर जोशींकडून श्री. गोपीनाथ मुंडे यांच्याकडे याच हिवाळी अधिवेशनात येणे, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी काढलेली शेतकरी दिंडी, शिवसेना नेते श्री. दिवाकरजी रावते यांची कापूस दिंडी, ११ डिसेंबर, २०१२ रोजी श्री. नितीनजी गडकरी, श्री. गोपिनाथजी मुंडे, श्री. एकनाथराव खडसे-पाटील, श्री. देवेंद्रजी फडणवीस, श्री. सुधीर मुनगंटीवार, श्री. विनोद तावडे यांच्या नेतृत्वाखाली निघालेला नागपूर अधिवेशनावरील विराट घेराव मोर्चा आणि त्याचे सभेत झालेले रुपांतर या घटनांची राजकीय इतिहासात नोंद झाली आहे.

विधानपरिषद सदस्यत्वाच्या (विदर्भ पदवीधर सन १९७८ ते ८४ आणि १९८४ ते १९९०) माध्यमातून दमदार कामगिरीद्वारे "विधानपरिषदेतील वाघ" असा लौकिक श्री. गंगाधरराव फडणवीस यांनी प्राप्त केला होता. सन २०१४ ते २०१९ या कालावधीत दस्तुरखुद्द नागपुरातील विधानसभा सदस्य असलेल्या श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून विदर्भाकडे मुख्यमंत्रीपद आले. या त्यांच्या कारकिर्दीत नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या माध्यमातून विदर्भाच्या विकासासंदर्भात सर्वकष प्रयत्न सभागृहात आणि सभागृहाबाहेर करण्यात आले. ज्याचे दृष्य परिणाम सध्या दिसत आहेत. नागपूर विधान भवन जुन्या इमारतीतील नवीन मंत्री परिषद सभागृहात त्यांनी अधिवेशन कालावधीत विदर्भातील सर्व जिल्ह्यांच्या विकासकामांच्या संदर्भातील सादरीकरणासह उच्चस्तरीय बैठकांचे काटेकोर नियोजन आणि अंमलबजावणी केली. गतीमान प्रशासनासाठी त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला.

१२५ व्या जयंतीनिमित्त महामानवाला मानवंदना...

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे औचित्य साधून नागपूर हिवाळी अधिवेशन डिसेंबर, २०१५ मध्ये दोन्ही सभागृहात त्यांच्या कार्याचा गौरव आणि अभिवादन करण्यासाठी विशेष चर्चेचे आयोजनही तत्कालीन मुख्यमंत्री आणि पीठासीन अधिकारी यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आले. सर्वपक्षीय सन्माननीय सदस्यांनी अतिशय अभ्यासूपणे यासंदर्भात आपले मनोगत व्यक्त केले. घटनाकारांना दोन्ही सभागृहांनी अशाप्रकारे केलेले अभिवादन हा विधिमंडळ कार्यवृत्तातील अनमोल ठेवा आहे.

वादे वादे जायते तत्वबोधाः...

ज्येष्ठांचे सभागृह, विद्वानांचे सभागृह असा लौकिक प्राप्त केलेल्या विधानपरिषदेने "वादे वादे जायते तत्वबोधाः" ही उज्वल प्रबोधन परंपरा जपली आहे. या शतक महोत्सवी वाटचालीत सभागृहाचे पीठासीन अधिकारी आणि विरोधी पक्षनेते यांचे विशेष योगदान लाभत आले आहे आणि लाभत राहिल. यंदाचे नागपूर डिसेंबर, २०२३ हिवाळी अधिवेशन या शतक महोत्सवाबरोबरच आणखी दोन कारणांसाठी महत्वपूर्ण ठरत आहे. दरवर्षी नागपूर अधिवेशनात राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा आयोजित केला जाणारा अभ्यासवर्ग यंदाचा सुवर्णमहोत्सवी असा ५० वा संसदीय अभ्यासवर्ग आहे. त्याचप्रमाणे नागपूर विधिमंडळाची ऐतिहासिक वारसावास्तू आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेसाठी प्रसिध्द आहे. या वास्तूची पायाभरणी १७ डिसेंबर, १९१२ करण्यात आली होती ज्याला यंद

कृषि उत्पन्न बाजार समितीचे नगर परिषदच्या जमीनीवर अनधिकृपणे व्यापारी संकुले

- मुख्याधिकारी, प्रशासक तथा तहसीलदार यांचे संगनमत
- तक्रार दाखल करून कार्यवाही शून्य
- बाजार समितीचे तारीख पे तारीख
- बाजार समितीवर प्रशासक व मुख्याधिकारी, प्रशासक तथा तहसीलदार यांच्या निलंबनाची मागणी

आमगाव – आमगाव नगर परिषद प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीतने चक्क नगर परिषद च्या मालकी हक्क जमीन वर अनधिकृतणे व्यापारी संकुले तयार करुन ते परस्पर वितरीत करून आर्थिक लाभ घेतला आहे. परंतु तक्रार दाखल करून कार्यवाही शून्य आहे. आता नागरीकानी बाजार समितीवर प्रशासक व मुख्याधिकारी, प्रशासक तथा तहसीलदार यांच्या निलंबनाची मागणी.

जिल्ह्यातील नावाजलेली कृषी उत्पन्न बाजार समिती आपल्या अनियमित कार्यप्रणालीने गाजली आहे. पूवीच मवेशी बाजार लीलाव नगर परिषद जागेत अनधिकृतपणे भरावून महसूल गोळा करून नगर परिषद चे महसूल बुडविला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. यातच कृषी उत्पन्न बाजार समिती ने थेट नगर परिषद आमगाव यांच्या मालकी हक्क जमीनीवर अनधिकृतणे व्यापारी संकुले बांधकाम करुन ते परस्पर वितरीत केले आहे.यात प्रशासक तथा तहसीलदार रमेश कुंभारे व मुख्याधिकारी यांचे संगनमत दिसून आले आहे. नागरिकानी याबाबद स्थानीक प्रशासाविरोधात जिल्हाधिकारी व महसूल नगर विकास विभाग यांना पत्र लिहून चौकशी करण्याची मागणी केली होती. यात कृषी उत्पन्न बाजार समिती चौकशी करीता तारीख पे तारीख मागताना पत्रव्यवहार करीत आहे.

नगर परिषद आमगाव यांची मौजा आमगाव येथे गट क्रमांक ४४आराजी ०.६४.००हेक्टर आर जमीन आहे.या जमिनीचे संपूर्ण महसूल अधिकार नगर परिषद आमगाव कडे आहे. परंतु कृषी उत्पन्न बाजार समिती आमगाव संचालक मंडळ यांनी आपल्या अधिकाराचे दुरुपयोग करून नगर परिषदच्या याच जमीनीवर व्यापारी गाळे तयार करुन ते परस्पर वितरीत केले. व्यापारी संकुले तयार करून घेताना प्रशासक तथा तहसीलदार व मुख्याधिकारी यांनी मौन का साधले हे चर्चेचा विषय बनला आहे.या व्यापारी संकुले बांधकाम व वितरणात मोठी रक्कम देवाणघेवाण झाली यात शंका नाही. नागरिकांनी या अवैध व्यापारी संकुले बांधकामची चौकशी करण्याबाबत प्रशासनाकडे दिनांक ८ आगस्ट २०२३ ला ग्राम सरक्षण समितीने लेखी तक्रार करून दोषींवर कारवाईची मागणी केली होती. परंतू कृषी उत्पन्न बाजार समितीने या चौकशी समोर होण्याआधी सबळ पुरावा दाखल करण्यासाठीं २४ आगस्त २०२३ पत्र देऊन मुदत मागण्यात आले.पण चार महिने लोटूनही तारीख पे तारीख मागताना पत्रव्यवहार करीत आहे.

तर मुख्याधिकारी व प्रशासक तथा तहसीलदार यांनी तक्रार अर्ज यावर कोणतीच कारवाई केली नाही. यामुळे नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांना पत्र पाठवून कार्यवाही करण्याची मागणी केली यावर प्रशस्थ कार्यवाही सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अवैध व्यापारी संकुले बांधकाम व वितरण याविरुद्ध नागरीकानी राज्यशासनाकडे कृषी उत्पन्न बाजार समिती वर प्रशासक तथा तहसीलदार व मुख्याधिकारी यांच्या निलंबनाची मागणी प्रमोद शिवणकर, तीरथ येटरे, रामकिशन शिवणकर,बाळू वंजारी, उमेश चतुर्वेदी,सागर फुंडे,राम चक्रवर्ती, यशवंत मानकर, राजेश देशमुख,दिलीप फुंडे. पिंटू महारवाडे, विनोद डोये, मुकेश शिवणकर,मेघश्याम फुंडे, किशोर फुंडे, सतीश शिवणकर, सतीश थेर, विजय शेंडे, सतीश दोनोडे, लक्ष्मण शेंडे,तेजस कावळे, डॉ. ओमप्रकाश थेर, गोकुल बसेन,दिलीप मेश्राम, मोणू गिरी , संदीप भांडारकर,शिरीष भांडारकर,जितेश वाढई , मेघश्याम मेंढे व नागरिक यांनी केली आहे.

दुर्गम, आदिवासी भागात "माहेरघर" ठरतेय नवसंजीवनी

बुडीत मजुरी दिली जाते – डॉ. राऊत

माहेरघर कार्यक्रम अंतर्गत माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. वैद्यकीय संस्थांमध्ये सुरक्षित बाळंतपण, माता व तिच्या बालकास निवास, जेवण, वैद्यकीय सुविधा, उपचार दिले जाते. गर्भवती महिलेला आरोग्य संस्थेत आणल्यापासून प्रसूती पश्चात रुग्णालयातून सुट्टी मिळेपर्यंतच्या एकूण कालावधीसाठी बुडीत मजुरी ३०० रुपये प्रति दिवस प्रमाणे प्रसुत महिला देण्यात येत असल्याचे अर्जुनीचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विजय राऊत यांनी सांगितले.

गोंदिया– जिल्ह्यातील अतिदुर्गम, आदिवासी, जंगलव्याप्त भागामध्ये दळणवळणाची, आरोग्य संसाधनांचा, दूरध्वनी नेटवर्कचा अभाव असतो. यामुळे बाळंतपणासाठी गरोदर मातेस प्राथमिक आरोग्य केंद्रात वेळेत पोहोचण्यास अडचण निर्माण होते

परिणामी अशा भागात माता व बालमृत्यूचे प्रमाण अधिक असते. हे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने ममाहेरघरफ योजना सुरू केली आहे. जिल्ह्यातील दुर्गम, आदिवासी, जंगलव्याप्त भागात 'माहेरघर' योजना नवसंजीवनी ठरली आहे.

माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याचे उद्देशाने राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात माहेरघरांची योजना सन २०११–१२ पासून कार्यान्वीत आहे. माहेरघरामध्ये गरोदर मातेला राहण्याची, आहाराची व्यवस्था, वैद्यकीय तपासणी, बाळंतपणाचा सल्ला, उपचार आदी सेवा व सुविधा देण्यात येतात. अर्जुनी मोर तालुक्यातील गोठणगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्षभरापुर्वी माहेरघर सुरू झाले. या कालावधी येथे आतापर्यंत ८ महिला प्रसुत झाल्या. गोठणगाव भाग आदिवासी व जंगलव्याप्त आहे. येथील गावांसाठी आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य संस्था हा एकमेव पर्याय आहे.

सद्यस्थितित गरोदर मातेस प्रसुतीसाठी आणण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राची रुग्णवाहीका नवसंजीवनी ठरत आहे. २२ नोव्हेंबर रोजी जांभळी येथील रेशमा तुलावी या गरोदर महिलेला आशा सविका वच्छला भोगारे यांनी रुग्णवाहीकेने गोठणगाव आरोग्य केंद्रात प्रसुतिसाठी भरती केले. वैद्यकिय अधिकारी डॉ. मोनाली तरेकार यांच्या नियोजनाने व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने सुरक्षित प्रसुती करण्यात आली. रेशमा यांनी ३ किलो वजनाच्या सुदृढ बाळाला जन्म दिला. माहेरघर ही शासनाची योजना गरोदर मातेला लाभदायक ठरत असल्याचे डॉ. मोनाली तरेकार, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र गोठणगाव यांनी सांगितले.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकरी ५० हजाराची मदत करा

आमदार कोरोटे यांची शासनाकडे मागणी

देवरी: अवकाळी पावसामुळे देवरी तालुक्यातील मुल्ला,ओवारा व हदीली येथील शेतक–यांच्या शेतातील नुकसान झालेल्या शेतपिकाची संबंधीत शासकिय यंत्रणेसोबत रविवार प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली आणि विधानसभेतील देवरी,आमगाव व सालेकसा तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतक–यांना एकरी ५० हजार रूपयाची नुकसान भरपाईच्या

या रूपात आर्थिक मदत करावी अशी मागणी या क्षेत्राचे आमदार सहषराम कोरोटे यांनी शासनाकडे केली तसेच या संबंधात नुकसानाचे पंचनामे त्वरीत तैयार करूण शासनाकडे नुकसान भरपाई मिळवून देण्याची कारवाई करण्याचे निर्देश तिन्ही तालुक्यातील संबंधीत शासकिय यंत्रणेला दिले आहे.

यात सविस्तर असे की,देवरी तालुक्यातील अवकाळी पावसामुळे मुल्ला, ओवारा व हदीली गावातील शेतक?यांच्या बांधावर जाऊन नुकसानग्रस्त क्षेत्राची पाहणी केली.अशाप्रकारचे चित्र संपूर्ण आमगाव –देवरी विधानसभा क्षेत्रातील देवरी,आमगावं व सालेकसा तालुक्यात असल्याने या क्षेत्राचे आमदार सहषराम कोरोटे यांनी विधानसभेतील देवरी,आमगाव व सालेकसा तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतक–यांना एकरी ५० हजार रूपयाची नुकसान भरपाईच्या रूपात आर्थिक मदत करावी अशी मागणी शासनाकडे केली तसेच या संबंधात नुकसानाचे पंचनामे त्वरीत तैयार करूण शासनाकडे नुकसान भरपाई मिळवून देण्याची कारवाई करण्याचे निर्देश तिन्ही तालुक्यातील संबंधीत शासकिय यंत्रणेला दिले आहे.

याप्रसंगी महिला काँग्रेसच्या देवरी तालुका अध्यक्ष सुनंदाताई बहेकार, मुल्लाचे सरपंच कल्पनाताई बागडे, उपसरपंच सौ.मेंढेताई,माजी सरपंच कृपाशंकर गोपाले,सामाजीक कार्यकर्ता मुकुंद बागडे,ओवाराचे सरपंच उमेश येरणे, हदीलीचे सरपंच गोरेलाल मलये, कांग्रेस पक्षाचे वरिष्ठ कार्यकर्ता बळीराम कोटवार,माजी पं.स. सदस्य जगत नेताम ,माजी सरपंच सुरेंद्र वालदे, मुन्ना मेश्राम,शिवा पुसाम,किशोर टेंभुणीकर,ग्रा.पं. सदस्य कपूरचंद पाचे यांच्यासह तालुक्यातील कृषी विभागातील अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी व तसेच संपूर्ण शासकिय यंत्रणेची टिम, गावकरी आणि ग्रामपंचायत सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

धानाला हेक्टरी २५ हजार बोनस मिळावा : माजी आमदार अग्रवाल

गोंदिया : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यावषी धानावर हेक्टरी २५ हजार रुपये बोनस देण्याची मागणी केली असून, राज्य सरकार लवकरच याबाबत सकारात्मक घोषणा करेल, असा विश्वास माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी व्यक्त केला.गोंदिया विधानसभा मतदारसंघात गेल्या ४ दिवसांपासून झालेल्या अवकाळी पावसामुळे पिकाचे नुकसान झाले.

या नुकसानीचा पाहणीकरिता ९ डिसेंबर रोजी माजी आ. गोपालदास अग्रवाल यांनी परसवाडा, बिरसी (का.), खातिया, अर्जुनी, टेमणी, चुलोद, आसोली, नवरगावकला, कामठा, झिलमिली, छिपिया, कटंगटोला आदी गावातील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांच्या झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी स्थानिक शेतकरी, तहसीलदार, संबंधित पटवारी व कृषी अधिकाऱ्यांशी चर्चा करून नुकसानीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी सांगितले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून अवकाळी पावसामुळे परिसरातील बिकट परिस्थितीची माहिती त्यांनी उपमुख्यमंत्र्यांना दिली असून भाजप सरकार प्रत्येक आपत्तीग्रस्त शेतकऱ्याच्या पाठीशी उभे असून सरकारकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. तसेच नियमानुसार पंचनामे करुन गावनिहाय यादी तयार करावी, अशा सूचना प्रशासनाला दिल्या. यावेळी तालुका भाजपा अध्यक्ष धनलाल ठाकरे, जिपचे माजी अध्यक्ष नेत्रम कात्रे, जिप सदस्य रितेश मलघम, भाऊलाल तरोणे, जिप सदस्य विजय उके, लक्ष्मी तरोणे, गुणीलाल देशभ्रतार, पंस सदस्य विनोद बिसेन, पुरुषोत्तम उईके, योगराज उपाडे, भुवनसिंह उपाडे, सुनीता दिहारी, कला भेंडारकर, निखिल चिखलोडे, अजबराव रिनायत, तोमेश्वरी कटरे आदी उपस्थित होते.

खेळ व सांस्कृतिक महोत्सव हे शिक्षक, समाज आणि विद्यार्थी यांच्या समन्वयाचे उत्कृष्ट माध्यम :– लायकराम भेंडारकर

अर्जुनी मोरगाव:– विद्यार्थ्यांच्या मनातली जिद्द ही त्याच्या प्रत्येक कामात यश मिळवून देते, यामुळे खेळामध्ये गुणवान असणारे विद्यार्थी जीवनामध्ये यशस्वी होतात,शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून या क्रिडा महोत्सवाची अत्यंत आवश्यकता आहे. क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम हे शिक्षक, समाज,विद्यार्थी यांच्या समन्वयाचे उत्कृष्ट साधन आहे असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे गटनेते तथा जिल्हा परिषद सदस्य लायकराम भेंडारकर यांनी केले. जिल्हा परिषद व कनिष्ठ महाविद्यालयाच्या पटांगणावर आयोजित अर्जुनी मोरगाव बीटस्तरीय अटल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

धानाला प्रतिक्विंटल ३१०० रुपये भाव मिळावा : आमदार विनोद अग्रवाल

गोंदिया : विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात आमदार विनोद अग्रवाल यांनी गोंदिया जिल्ह्या–तील शेतकऱ्यांच्या समस्यांकडे सदनाचे लक्ष वेधले. तसेच धानाला प्रतिक्विंटल ३१०० रुपये भाव देऊन अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामा करून शासनाने हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी केली.आ. अग्रवाल यांनी सदनात, जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या धानाला मध्यप्रदेश व छत्तीसगडच्या धतीवर ३१०० रुपये प्रतिक्विंटल भाव द्यावा. हेक्टरी २० हजार रुपये बोनस जाहीर करावा, शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि सन्मान निधीच्या अडचणी दूर कराव्यात, पंतप्रधान किसान सन्मान योनजेतंर्गत केंद्र सरकारकडून दरवर्षी ६ हजार रुपये आणि महाराष्ट्र सरकारकडूनही ६ हजार रुपयांचा लाभ देताना येणाऱ्या तांत्रिक अडचण दूर कराव्यात, कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन रक्कम देण्यात यावी, सरकारने ठरवून दिलेल्या किमतीपेक्षा दूध उत्पादक शेतकऱ्यांना कमी भाव मिळत असून, किमान भावापेक्षा कमी दराने शेतकऱ्यांकडून दूध खरेदी करू नये, तसेच बँकांनी जास्तीत जास्त पीक कर्जाचे उद्दिष्ट गाठावे, आदी मागण्या आमदार विनोद अग्रवाल यांनी अधिवेशनात मांडल्या.

पुनर्वसित गावांतील भौतिक सुविधांसाठी निधी उपलब्ध करून द्या:-जि.प.उपाध्यक्ष गणविर

अर्जुनी मोर. – मतदार जनसंपर्क कार्यालय कोहमारा येथे महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन कार्यकर्त्यां संबोधित केले.या प्रसंगी गोंदिया जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजि यशवंत गणविर यांनी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील पुनर्वसित गावांतील भौतिक सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. अर्जुनी मोरगाव तालुक्याचा बहुतांश भाग हा अतिदुर्गम आदिवासी बहुल क्षेत्रात व घनदाट जंगल,डोंगराळ भागात वसलेला असुन,या तालुक्यातील ईटियाडोह धरणाचे सन १९६४ मधे लोकार्पण झाले या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात असलेल्या गावातील लोकांचे पुनर्वसन करण्यात आले परंतु आजतागायत त्या पुनर्वसित गावांतील जनता भौतिक सुविधांपासून वंचित आहेत.त्यांना त्यांच्या गावात भौतिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार मनोहर चंद्रिकापुरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, जिल्हा परिषद सदस्य सुधाताई रहांगडाले ,लोकपाल गहाणे, अविनाश काशीवार तथा शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रीय लोक अदालतीत १० हजार प्रकरणे निकाली

गोंदिया : राष्ट्रीय लोक अदालतमध्ये एकूण ठेवलेल्या प्रकरणांपैकी १० हजार ८१ प्रकरणे निकाली काढण्यात आली व एकूण रुपये ४ कोटी २० लाख ५६ हजार ८०३ एवढी वसुली करण्यात आली. जिल्ह्यातील न्यायालयात प्रलंबीत दिवाणी प्रकरणांपैकी ६१ प्रकरणे निकाली काढण्यात आली व यामध्ये रुपये १ कोटी ४२ लाख ०६ हजार ९४५ वसुलींचे प्रकरणे निकाली निघाले. न्यायालयात प्रलंबीत फौजदारी प्रकरणांपैकी ९२१ प्रकरणे निकाली काढण्यात आली व रुपये २ कोटी ८ लाख ८४ हजार ८३८ वसुलींचे प्रकरणे निकाली निघाली. तसेच लोकअदालतमध्ये ठेवण्यात आलेले पुर्वन्यायप्रविष्ठ प्रकरणांपैकी ९ हजार ९९ प्रकरणे निकाली काढण्यात आली व यामध्ये ६९ लाख ६५ हजार २० रुपयांची वसुली झाली.

वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित असलेले खटले समोपचाराने व सामंजस्याने तात्काळ निकाली काढण्याकरिता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशानुसार अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गोंदिया ए. टी. वानखेडे तसेच सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस. व्ही. पिंपळे यांचे मार्गदर्शनाखाली ९ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय गोंदिया येथे तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका विधी सेवा समित्यांमार्फत तालुका न्यायालयांमध्ये सर्वच प्रकारच्या तडजोड पात्र न्यायप्रविष्ठ व पूर्व न्याय प्रविष्ठ प्रकरणाकरिता तसेच विद्युत व बँक लोकोपयोगी पूर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणांकरीता राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे स्पेशल ड्रईव्ह अंतर्गत जिल्ह्यातील न्यायालयामध्ये ठेवण्यात आलेल्या फौजदारी प्रकरणांपैकी ७८७ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यामुळे पक्षकार व इतरांना होणारा मानसिक व आर्थिक त्रास यामधून सुटका मिळाली. यामुळे बऱ्याच पक्षकारांनी समाधान व्यक्त केले. या लोक अदालतीची विशेष बाब म्हणजे विद्युत, पाणी टेलिफोन, बँक रिकव्हरी यांचे पुर्वन्यायप्रविष्ठ प्रकरणातील ज्या पक्षकारांनी तडजोडीप्रमाणे थकबाकीची पूर्ण रक्कम संबंधित विभागाला जमा केली त्यांची प्रकरणे कायमची संपवण्यात आली. यामुळे संबंधीत विभाग व थकबाकीदारांचा भविष्यातील न्यायालयीन खर्च व मानसिक त्रास वाचला.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एस. व्ही. पिंपळे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष एड. सी. के. बडे, जिल्हा वकील संघाच्या उपाध्यक्ष ॲड. आरती भगत यांचे प्रमुख उपस्थितीत लोक न्यायालयाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे तसेच जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष एड. सी. के. बडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. टी. वानखेडे यांनी लोक अदालतीचे फायदे व महत्व याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्याकरिता गोंदिया येथील ए. एम. खान, जिल्हा न्यायाधीश –१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश गोंदिया, एन. डी. खोसे, जिल्हा न्यायाधीश–२ तथा अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, एन. बी. लवटे तदर्थ न्यायाधीश–१ तथा अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, आर. एस. कानडे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, ए. व्ही. कुलकर्णी मुख्य न्यायदंडाधिकारी, वाय. आर. मुक्कणवार कामगार न्यायाधीश कामगार न्यायालय गोंदिया, एस. आर. मोकाशी सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, एस. एस. धपाटे २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, व्ही. ए. अवघडे, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, एम. बी. कुडते ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वाय. जे. तांबोळी ४ थे सह दिवानी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, एस. डी. वाघमारे ५ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, टी. व्ही. गवई ६ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांनी व जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष सी. के. बडे, उपाध्यक्ष एड. आरती भगत, सचिव एस. आर. बोरकर व इतर पदाधिकारी तसेच पॅनलवरील वकील एड. कांचन ठाकरे, एड. कमलेश चिखलोंढे, ऐड. तेजस रुपारेल, ऐड. राहुल सिक्का, एड. कुसुम कटरे, एड. युगुल पारधी यांनी सहकार्य केले.

सदर लोक अदालतीचे यशस्वी आयोजनाकरिता पी. बी. अनकर प्रबंधक, एम. पी. पटले सहायक अधीक्षक जिल्हा न्यायालय गोंदिया, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथील ए. एम. गजापुरे वरिष्ठ लिपीक, सचिन कठाणे, पी. एन. गजभिये, के. एस. चौरे, एल. ए. दर्वे, प्रिती जेंगठे, नेहा चौरसिया कनिष्ठ लिपीक तसेच ए. पी. मेश्राम लेखापाल, बी. डब्ल्यु. पारधी, रोहित मेंढे शिपाई, नितीन चिंधालोरे बेलिफ, टी. ए. पडोळे, एस. के. भोयर, पॅरा लिगल व्हालंटिअर्स गोंदिया तसेच इतर न्यायालयीन कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

गोंदिया जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग आजारी

ही पदे रिक्त

गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रत्येकी १ पद, तालुका आरोग्य अधिकाऱ्यांची ५ पदे, वैद्यकीय अधिकारी गट 'अ' ५ पदे, वैद्यकीय अधिकारी गट 'ब' १० पदे, आरोग्य पर्यवेक्षक ४, आरोग्यसेवक पुरुष ७, आरोग्यसेवक महिला १९, आरोग्यसेवक ९५, आरोग्यसेविका २२४, औषध निर्माण अधिकारी १०, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ४ पदे अशी तब्बल ३८५ पदे रिक्त आहेत याशिवाय रुग्णवाहिका चालकांसह वर्ग ४ संवर्गातील शिपाई, सफाईगार यांची शेकडोपदे रिक्त आहेत

गोंदिया : राज्यात अविकसीत मागास व नक्षल प्रभावित म्हणून गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व प्रशासकीय यंत्रणेला गोंदिया जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात असलेल्या रिक्त पदांशी काही घेणे देणे नाही, रिक्त पदांमुळे जणू आरोग्य विभागच आजारी पडला आहे.आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तब्बल ३८५ पदे रिक्त आहेत. यामुळे रुग्णांचे हाल होत आहेत. तसेच रिक्त जागांचा अतिरिक्त ताण आरोग्य विभागाच्या कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर आहे.

गोंदिया जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे ४५ प्राथमिक आरोग्य केंद्र व २६८ आरोग्य उपकेंद्र आहेत. प्रत्येक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती असणे अपेक्षित आहे. मात्र यातील बहुतांशी आरोग्य केंद्रात स्थायी वैद्यकीय अधिकारी नाहीत. ज्या ठिकाणी आहेत ते कंत्राटी आहेत. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागात गट अ, ब, ड संवर्गातील ८८३ पदे मंजूर आहेत. यातील जवळपास ३८५ पदे सध्या रिक्त आहे. सध्या आरोग्य केंद्रात कामावर असणाऱ्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर रिक्त पदांचा भार आहे. अनेक आरोग्य केंद्रांत वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येचा फटका रुग्णांना बसत आहे. २०१९ पासून आरोग्य विभागाची भरती रखडल्याने मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत. तसेच दरवषी सेवा निवृत्त होणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमुळे यामध्ये भरच पडली आहे. आरोग्य विभागाची रिक्त पदे तातडीने भरावीत, यासाठी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरु असल्याचे आमदार विनोद अग्रवाल यांनी सांगितले.

जि.प.अध्यक्षांच्या आश्वासनाला लोटले दोन महिने

गोंदिया: जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर आणि अर्जुनी मोरगाव तालुक्यातील आदिवासी दुर्गम भाग असलेल्या ईळदा आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन चार महिन्यानंतर होणार, अशी ग्वाही गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी ३० सप्टेंबरला दिली होती.

ईळदा आरोग्यवर्धिनी केंद्राला भेट देत अखेर केशरी जि.प.क्षेत्राचे जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत घाटबांधे यांनी २ ऑक्टोबरला घोषित केलेले उपोषण तूर्तास थांबविले. आश्वासनाला दोन महिने लोटले असताना अद्याप कसलीही हालचाल सुरु झाली नाही. त्यामुळे उपोषण मागे घेण्यासाठीच आश्वासन दिले होते काय?असा सवाल उपस्थित केला जात आहे.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागात राज्याचे तत्कालीन सामाजिक न्याय व विशेष सहायमंत्री राजकुमार बडोले यांच्या अथक प्रयत्नांनी कोट्यावधी रुपये खर्च करुन ईळदा प्राथमिक आरोग्य केंद्राची सुसज्ज इमारत तथा आरोग्य कर्मचाऱ्यांना निवासस्थानासाठी तीन मोठ्या इमारती २०१९ लाच नववधूसारख्या उभ्या झाल्या. २०२१ पर्यंत या सर्व इमारतीत पाणीपुरवठा व इलेक्ट्रीक फिटींगचीही कामे

पूर्णत्वास केली गेली असल्याची माहिती ३० सप्टेंबरला संबंधित कंत्राटदारांनी खुद्द जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व शेकडो ग्रामस्थांसमोर दिली.

मात्र संपूर्ण यंत्रणेने परिणूर्ण ही इमारत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला हस्तांतरित केलेली नाही. मध्यंतरी कोरोना काळ आला. यावेळी कंत्राटदार व जिल्हा परिषद यांनी कुठलाही चौकीदार न ठेवल्याने या चार वर्षात सदर इमारतीमधील इलेक्ट्रीक फिटींगची तोडफोड झाली. इमारत हस्तांतरित झाली नसल्याने या इमारतीमधील संपूर्ण साहित्याची तोडफोड करुन लाखो रुपयांचे सामान चोरीला गेल्याची शंका व्यक्त करण्यात येत. या इमारतीत लावलेल्या शंभरपैकी एकही पंखा शिल्लक नसल्याचे प्रत्यक्ष दिसून आले. शौचालय व बाथरूमचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आरोग्यवर्धिनी त्वरित सुरु करावी, या मागणीसाठी जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत घाटबांधे व परिसरातील नागरिकांनी २ ऑक्टोबरपासून आंदोलन व आमरण उपोषण करण्यचा इशारा दिला होता.

डेडलाइन हुकणार तर नाही ना?

या आंदोलनाची दखल घेत गोंदिया जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, उपाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य

२ ऑक्टोबरपासून उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला होता. मात्र जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या आश्वासनाने तात्पुरते उपोषण मागे घेण्यात आले. परंतु २६ जानेवारी २०२४ पर्यंत ईळदा आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु न झाल्यास तीव्र आंदोलन व उपोषण केले जाईल.
श्रीकात घाटबांधे, जि.प.सदस्य

सभापती यशवंत गणवीर, जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत घाटबांधे, जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका वैद्यकीय अधिकारी, संबंधित कंत्राटदार संपूर्ण यंत्रणेसह ईळदा आरोग्यवर्धिनी येथे आले.

त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता इमारतीच्या आतमधील परिस्थिती चिंताजनक दिसली. चार महिन्यात नवीन इमारतीतून कारभार सुरु होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र दोन महिने लोटून अद्याप कामाला सुरुवातच झाली नाही. परिणामी आश्वासन केवळ फार्स ठरला. जि.प. प्रशासनाने दिलेली २६ जानेवारी २०२४ पुर्वी आरोग्य सेवा सुरु करण्याची डेडलाइन हुकणार तर नाही ना? अशी चर्चा आता नागरिकांमध्ये सुरु आहे.

ध्वजदिन निधी संकलनासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा – जिल्हाधिकारी गोतमारे

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम

गोंदिया – देशाच्या संरक्षणासाठी आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या सैनिकांच्या कुटूंबियांच्या जीवनातील अडी अडचणी दूर करुन त्यांचे दैनंदिन जीवन सुखकर व्हावे तसेच युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या सैनिकांच्या पुनर्वसनासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरीता त्यांच्या कुटूंबांना विविध माध्यमातून सहयोग करण्यासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाकरीता प्रत्येक अधिकारी-कर्मचारी व सर्वसामान्य नागरिकांनी सढळ हाताने सहयोग करावे. असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात (दि.७) सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्मिता बेलपत्रे, अपर पोलीस अधीक्षक नित्त्यानंद झा, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) भैय्यासाहेब बेहरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कादर शेख यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. गोतमारे म्हणाले, देशासाठी ज्या सैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले त्यांच्या कुटूंबासाठी लोकांच्या मनात सैनिकांप्रती कृतज्ञता असणे गरजेचे असून त्यांना दिलासा देण्यासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन करण्यात येतो. माजी सैनिकांच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी संपूर्ण भारतात ७ डिसेंबर हा दिवस ध्वजदिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने ७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेर पर्यंत निधी संकलित केला जातो असे त्यांनी सांगितले.

आपल्या देशाच्या बहुमोल स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणारा, आपत्तीच्या काळात देशबांधवांच्या मदतीला धावून जाणारा, उन्हातान्हाची, थंडीपावसाची व कोणत्याही अडचणीची पर्वा न करता आपली कर्तव्य चोखपणे बजावणारा देशाचा बहादुर सैनिक हा आपल्या सर्वांच्या आदराचा आणि अभिमानाचा प्रतिक आहे. परकीय शक्तीपासून देशवासीयांचे रक्षण करण्यासाठी व देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखुन आपल्या पाठीशी भक्कमपणे अहोरात्र उभ्या असणा?या या सैनिकांचे आपल्यावर फार मोठे ऋण आहे. त्यामुळे सशस्त्र सेवा ध्वजदिन निधी संकलनात सर्वांनी सढळ हाताने सहयोग करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

स्मिता बेलपत्रे म्हणाल्या, सैनिकांच्या पुनर्वसनाच्या कामासाठी व विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी वापरण्यात येतो. त्यामुळे प्रत्येक शासकीय विभागाने आप-आपल्याप्रती या उपक्रमास सढळ हाताने सहयोग करावे. सर्व विभागाचे सहकार्य जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाला मिळेल अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, अपर पोलीस अधीक्षक नित्त्यानंद झा, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) भैय्यासाहेब बेहरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कादर शेख यांनीही यावेळी समयोचित मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधीक्षक उध्दव नाईक, लेखाधिकारी मंदार जोशी, नायब तहसिलदार जे. एच. पोरचेट्टीवार, तलाठी श्री. चौधरी, श्री. सोनवाने, नाझर राकेश डोंगरे, सारिका बंसोड, स्मिता शेटे, अश्विनी पवार, सोनाली पाथोडे, स्नेहा मेश्राम, माधुरी मेश्राम, अनुसया नागपुरे, महसूल सहायक पुष्पा काळे, ए. एम. पारधीकर, संतोष शेंडे, आशिष भोयर, अमोल गजभिये, संदिप बडवाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन माजी सैनिक गणेश बिसेन यांनी केले. उपस्थितांचे आभार कल्याण संघटक धनराज बावनथडे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

लालफीतशाहीत रखडले डोंगरगाव-रेंगेपार पुलाचे काम

सडक अर्जुनी : तालुक्यातील डोंगरगाव ते रेंगेपार दरम्यान नाला आहे. या नाल्यावर पुलाच्या बांधकामासाठी २००५ मध्ये १० लाख रुपये मंजूर झाले. नेते आले, पुलाचे भूमिपूजन करून गेले.पुलाचे बरेच काम झाले. मात्र, अप्रोच रोडअभावी हे काम रखडले आहे. यामुळे चार गावांतील शेतकरी, गावकरी, विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागते. याशिवाय गावाच्या विकासाला खीळ बसली ती वेगळी.

तिन हजारावर लारेकवसती असलेले डोंगरगाव तालुक्यातील मोठे गाव आहे. या गावाच्या आजूबाजूला रेंगेपार, सीतेपार, उसीखेडा, शेंडा, कोहरीटोला, परसोडी, चिरचाडी ही गावे आहेत. नागरिकांना तालुका, जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यास या पुलाचा उपयोग होणार आहे. पुलाचे अर्धवट काम पुर्ण करण्यासाठी गावकऱ्यांनी शासन, लोकप्रतिनिधींकडे अनेकदा निवेदने दिली, तरी सरकार हलत नसल्याने लोक हतबल झाले आहेत. वर्षभरापूर्वी ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या. सरपंचपदी तरुण मंडळी आली, त्यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू केला.

दरम्यान, जिल्ह्यात जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे आले, त्यांनी रखडलेली कामे मार्गी लावण्याचा सपाटा सुरू केला, त्यानुसार त्यांनी रखडलेल्या पुलाच्या संदर्भात वर्षभरात डझनावर बैठका घेतल्या, सार्वजनिक बांधकाम विभाग, भूमी अभिलेख खाते आणि भूसंपादन विभागाचा समन्वय घडवून आणला, त्यानुसार वेगवेगळ्या विभागांचे वर्षभरात १५ च्या वर आदेश निघाले, उपविभागीय कार्यालयाचे गरजेनुसार चार-पाच वेगवेगळे आदेश आहेत.

त्यात अलिकडेच काढलेल्या भूसंपादन आणि मोजणीच्या आदेशाचा समावेश आहे. येथ्ज्ञील तहसीलदारांनी दोन आदेश काढले, तलाठ्याने फेरफार केले. जिल्हाधिकाऱ्यांनी भूसंपादन अधिकारी नेमण्याचा आदेश काढला, तर जिल्हा भूमिअभिलेख अधीक्षक व तालुका भूमिअभिलेख विभागानेही सहापेक्षा जास्त आदेश काढले. एका रखडलेल्या पुलाच्या कामाराठी वर्षभरात शासकीयस्तरावर पंधरापेक्षा जास्त आदेश निघालेत. जिल्हाधिकाऱ्यांकडे कमी-अधिक तेवढयाच बैठका पार पडल्या.

एका पुलाच्या कामासाठी वेगवेगळ्या विभागात गावकऱ्यांना कराव्या लागलेल्या पावपुराण्याचा हिशेबच नाही. जिल्हाधिकाऱ्यांचा रेटा आणि गावकऱ्यांच्या पाठपुराव्याला अलिकडे थोडे यश आले, पंधराच्यावर आदेश निघाले, त्यानुसार कारवाई झाली. आता जागेच्या तातडीच्या मोजणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ४ डिसेंबर २०२३ रोजी ३६ हजार रुपये भरले. त्याला आठवडा झाला, ऑनलाइनच्या काळात पैसे भरल्याचा कागद हातात पडत नाही. तोपर्यंत मोजणी केली जाणार नाही असा भूमि अभिलेख खात्याचा अट्टाहास आहे. हा कागद भूमिअभिलेख खात्याच्या अधिकाऱ्यांच्या हाती पडणार, त्यानंतर ते अधिकारी मोक्याच्या ठिकाणी जाणार, जागेची मोजणी करणार, पुलाच्या अप्रोच मार्गाची जागा खुडवून देणार, त्याचे नकाशे व कागदपत्रे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुपूर्द करणार. त्यानंतर प्रत्यक्षात पुलाच्या अप्रोच रोडचे काम सुरू होणार असले तरी पुलाचे काम केव्हा सुरू होणार याकडे गावकड्यांचे लक्ष लागले आहे. तिकडे कित्येक वर्षापासून सरकारी तिजोरीत ५० लाखांवर रुपये पुलाच्या कामाविना पडून आहेत.

अवकाळी पावसामुळे नुकसान शेतकर्याना बोनस व भरपाई द्या- प्रफुल पटेल

गोंदिया- अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. नुकसानग्रस्तांना भरपाई व धानाला बोनस जाहीर करावा, अशी मागणी राज्यसभा सदस्य तथा माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांनी ८ डिसेंबर रोजी नागपूर येथे राज्य शासनाला केली.वरील मागणीचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांना सोपविले.

पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांचे अवकाळी पावसामुळे धानपिक, कापणी केलेले धानाचे कडपे, शेतात मळणीसाठी जमा करून ठेवलेले धान पुजऱ्यांचे व कडधान्य पीकाचे नुकसान झाले आहे. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी, मशागतीचा वाढीव खर्च लक्षात घेता डीबीटीच्या माध्यमातून धान उत्पदकांना सानुग्रह अनुदान (बोनस) हेक्टरी २५ हजार रुपये जाहीर करावे, अशी मागणी आज शुक्रवारी पटेल यांनी नागपूर येथे मख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, अजित पावार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगण भूजबळ यांची भेट घेत निवेदनाद्वारे केली. यावेळी तिरोडाचे आ. विजय रहांगडाले, गोंदियाचे आ. विनोद अग्रवाल, अर्जुनीचे आ. मनोहर चंद्रिकापुरे, तुमसरचे आ. राजू कारेमोरे, राजेंद्र जैन, गोपालदास अग्रवाल, भंडारा जिल्हा बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे उपस्थित होते.

फटाका सायलेन्सरवर चालविला रोडरोलर

वाहतूक नियंत्रण शाखेचा प्रयोग

गोंदिया: कानठळ्या वाजविणाऱ्या फटाका सायलेन्सर व प्रेशर हॉर्नमुळे शहरवासीय चांगलेच वैगातले आहेत. अशात त्यांच्यासाठी दिलासादायक बाब म्हणजे वाहतूक नियंत्रण शाखेने असे ५८ सायलेन्सर व प्रेशर हॉर्न जप्त केले असून, मंगळवारी (दि.१२) त्यांच्यावर रोडरोलर चालविला. येथील जयस्तंभ चौकातील प्रशासकीय इमारतीसमोर सायंकाळी शहरवासीयांच्या डोळ्यांदेखत हा प्रयोग करण्यात आला.

शहरात वाहनांची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने वाढत चालली आहे. त्यातही काही बहाद्दर आपले वाहन काही वेगळे असावे व सर्वांना आकर्षूण घेण्यासाठी त्यात नवनवे जुगाड करतात. यामध्ये फटाका सायलेन्सर लावले जाते, तर कित्येक जण वेगवेगळे आवाज करणारे किंवा प्रेशर हॉर्न लावतात. असले वाहन रस्त्याने कर्णकर्कश आवाज करीत गेल्यावर मात्र नागरिकांच्या कानठळ्या वाजतात. सततच्या अशा आवाजाने तर डोकेदुखी होऊ लागते. या फटाका सायलेन्सरमुळे ध्वनिप्रदूषण होत असून,

फटाका सायलेन्सर व प्रेशर हॉर्नचा वापर ध्वनिप्रदूषण करीत असतानाच नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. शिवाय फॅन्सी नंबरप्लेटसुद्धा वाहतूक नियमांच्या विरुद्ध आहे. यामुळे कुणीही त्यांचा वापर करूनये. अन्यथा त्यांच्यावरही कारवाई केली जाईल.
-किशोर पर्वते, निरीक्षक, वाहतूक नियंत्रण शाखा, गोंदिया

शहरवासीय अशा वाहनांमुळे पार वैतागले आहेत. यामुळेच अशा वाहनांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत होती.

शहरवासीयांची मागणी व त्यांना होणारा त्रास लक्षात घेत वाहतूक नियंत्रण शाखेचे निरीक्षक किशोर पर्वते यांनी त्यांच्या विभागाला अशा फटाका सायलेन्सर व प्रेशन हॉर्न असलेल्या वाहनांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. यातूनच वाहतूक पोलिसांनी ५८ फटाका सायलेन्सर व प्रेशर हॉर्न जप्त केले होते. मंगळवारी (दि. १२) शहरातील प्रशासकीय इमारतीसमोर या सायलेन्सर व प्रेशर हॉर्नवर रोडरोलर चालवून त्यांचा नायनाट करण्यात आला.

मोडीफाईड वाहन पोलिसांच्या रडारवर

शहरात सध्या तरुणांकडून जुनाट वाहनांना रंग लावून तसेच फटाका सायलेन्सर वगैरेंचा वापर करून मोडीफाय करण्याचा प्रकार दिसून येत आहे. ध्वनी व वायूप्रदूषण करणारे वाहन शहरवासीयांसाठी चांगलेच डोकेदुखीदायक ठरत आहेत. अशी काही वाहने वाहतूक नियंत्रण शाखेने जप्त केली असून, तशी वाहने आढळून आल्यास ती वाहने जप्त केली जाणार आहेत.

पिपरी रेती घाटावर तस्करांचा धुमाकुळ

सडक अर्जुनी: तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर रेतीची अवैध वाहतूक व उत्खनन सुरु असून महसूल प्रशासनाकडून रेतीतस्करांवर कारवाई केली जात नाही. त्यामुळे नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेष म्हणजे तालुक्यातील पिपरी रेती घाटावर रेतीतस्करांनी धुमाकुळ घातला असून याकडे संबंधित विभागाचे सस्पेशल दुर्लक्ष झाले आहे. तेव्हा संबंधित विभागाचया कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सडक अर्जुनी तालुक्यातून वाहणारी चुलबंद ही मुख्य नदी असून नदी पात्रातील राका पिपरी रेती घाटातून लिलावातून शासनाला मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त होत असतो. मात्र, मागील वर्षीपासून रेतीघाटांचे लिलाव न झाल्याने राका, पिपरी, पळसगाव रेती घाटातून मोठ्या प्रमाणावर रेतीचे अवैध उत्खनन करुन वाहतुक सुरु आहे. रेतीतस्करांचे वाहन रस्त्यावरुन वेगाने धावत असतात. त्यामुळे या मार्गावरुन नेहमीच अपघाताची शक्यता बळावली असते. रेती भरलेले वाहन गावातून रात्रंदिवस धावत असल्याने वाहनाच्या कर्णकर्कश आवाजाने ग्रामस्थांची झोप उडाली आहे. असे असताना महसूल प्रशासन मात्र, गाढ झोपेत असल्याचे चित्र आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासनावर नियमबाह्य दबंगशाही!

आमगाव – आमगाव येथील नावाजलेला चंमापष्ठी मेला कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासनावर नियमबाह्य दबंगशाही मुळे बनगाव येथे बाजार समिती संचालक मंडळा विरुद्ध तीव्र असंतोष निर्माण झाले आहे.तर नगर परिषद येथील मालकी जागेवर नियमबाह्यपणे चंपाषष्ठी मेला भरउन कृषी उत्पन्न बाजार समितीने चक्क नगर परिषदचे महसूल उत्पन्नावर डल्ला मारला आहे.व तहीलदारांसह पोलीस विभागाने शासनाची फसवणूक केली असल्याचे टीका नागरिकांनी पत्रपरिषदेत केली आहे.बंनगाव येथील माता मंदिर परिसरात नागरिकांनी पत्रपरिषदेत घेतली यावेळी त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीवरील अनियमित कामांना वाचा फोडली.

आमगव येथे पूर्व विदर्भातील प्रसिद्ध असा चंपाषष्ठी मेला बाजार हा दरवषी आकर्षणाचा भाग असतो, परंतू बाजार समितीच्या एकाधिकारशाही पणामुळे या चंपाषष्ठी मेला हा जागेच्या अनियमित वापर व महसूल घोळ यावरून वादग्रस्त ठरला आहे.कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाचा गैरकरभाराविरुद्ध प्रशासन हतबल ठरला आहे.

✻ नगर परिषदच्या महसुलावर डल्ला
✻ तहसीलदार यांचे संगनमत
✻ नागरिकांनी पत्रपरिषदेत दिली माहिती

नगर परिषद मालकीची गट क्रमांक ४८ आराजी ०६६.०० जमीन बंनगाव ग्रामपंचायत यांच्या हद्दीतील असून सद्यस्थितीत नगर परिषद आमगाव यांच्या कडे वर्ग करण्यात आली आहे.या जमिनीवर अनेक वर्षापासून नागरिक वार्षिक उत्सव,क्रीडा स्पर्धा आयोजित करतात. गावातील सांस्कृतिक कला साहित्य अकादमी द्वारा अनेक उपक्रम राबविले जातात. परंतु याच परिसरात अनधिकृरीत्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एकाधिकारशाहीमुळे नियम बाह्य पद्धतीने मवेशी बाजाराचे लिलाव करून नगर परिषद चा महसुल बुडउन महसूल गोळा केल्या जात आहे.या अनधिकृत मिळविलेला महसूलावर कृषी उत्पन्न बाजार समिती सरळ डल्ला मारत आहे.यात स्थानिक नगर परिषद प्रशासक तथा तहसीलार यांची मूकसंमती मात्र नगर परिषद महसुल ची विल्लेवाट लावत आहे.नगर परिषद जागेवर गट क्रमांक ४८ आराजी ०.६६.० आहे.या जागेवर चंपाषष्ठी मेला लावण्यासाठी बनगाव येथील नागरिकांनी पुढाकर घेऊन शुभम मनोज कोटांगले यांनी नगर परिषद ला महसूल भरून परवानगी घेतली तर तहसील कार्यालयात पुढील परवानगी करिता अर्ज केला यात कृषी उत्पन्न बाजार समितीने भाजी बाजार व नगर परिषदच्या जागेवर चंपाषष्ठी मेला लावण्यासाठी अशरफ भाटी याला परवानगी दिली यातच जागेचा वाद निर्माण करून बाजार समितीने नियमबाह्य पद्धतीने खतपाणी घातले.कृषी उत्पन्न बाजार समिती दरवषी चंपाषष्ठी मेला लावण्यासाठी ठेकेदार यांच्याकडून मोठे महसूल गोळा करते. बाजार समितीच्या आवार सह नगर परिषदच्या जागेचा अनधिकृरीत्या वापर करते परंतू वापर केलेल्या जमिनीचे एकही महसूल नगर

परिषदेत न भरता सरळ डल्ला मारला जातो यात नगर परिषद प्रशासक व तहसीलदार याची भूमिका संसायस्पद दिसून आले आहे.

कृषि बाजार समितीने चक्क हवेत मावेशि बाजार व चंपाषष्ठी मेला परवानगी देत सरळ नगर परिषदेची जमीन वापरून महसुल वसूल केला आहे.परंतु नगर परिषद आमगाव येथील प्रशासक व तहीलदार यांची मौन भूमिका आर्थिक घोळ झाल्याचे सिद्ध करित आहे.नगर परिषद आमगाव यांनी आपली मौजा बंनगाव येथील गट क्रमांक ४८ आराजी ०.६६.०० हे पटांगण चंपाषष्ठी मेला लावण्यासाठी ठेकेदार शुभम कोटांगले याला महसूल स्वीकारून दिनांक २२ सप्टेंबर २०२३ला परवानगी दिली.परंतु सदर जमीन कृषि उत्पन्न बाजार समिती वापरते असे पत्र पाठवून त्या जागेवर चंपाषष्ठी मेला लावण्यासाठी ठेकेदार शुभम कोटांगले ची परवानगी रद्द करण्याची मागणी केली गेली. व कृषि उत्पन्न बाजार समितीने अशरफ भाटी याला दिलेली परवानगी गृहीत घेऊन परवानगी देण्याची मागणी केली.यात प्रशासक तथा तहसीलदार यांनी जाणीवूर्वक रीतसर परवानगी घेतलेली शुभम कोटांगले यांची परवानगी रद्द करून नगर परिषद च्या मिळणाऱ्या महसुलावर पाणी फेरले.प्रशासक तथा तहसीलदार रमेश कुंभरे यांनी राजकीय दबावतंत्र खाली नगर परिषदची जमीन नियमबाह्य कृषि उत्पन्न बाजार समितीला वापरण्यासाठी हस्तांतरण केले. परंतू मिळणाऱ्या महसूल बुडेल याची खबरदारी घेण्यात आली नाही.

ॐ प्रशासक तथा तहसीलदार रमेश कुंभरे यांच्यावर कार्यवाहीची मागणी

-:नगर परिषदची गट क्रमांक ४८ ची जमिनीवर कृषी उत्पन्न बाजार समिती नियमबाह्य पद्धतीने मागील सन २०१५ नंतर मवेशि बाजार, चंपाषष्ठी मेला लिलाव करून हवाला पद्धतीने महसूल स्वीकारून घोळ करीत आहे. परंतू नगर परिषद प्रशासक तथा तहसीलदार यांनी नागरीकांची तक्रार असून सुद्धा कोणतीच कारवाई केली नाही. उलट त्यांना संरक्षण देण्यात आले.त्यामुळे नगर परिषद आमगाव ला मिळणारे महसूल संगनमताने बुडवीन्यात आले.या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी पत्र परीषद घेऊन केली आहे.

ॐकृषि उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक बसविण्याची मागणी :- नगर परिषदची आमगाव मालकी हक्क जमीन वापरून नियमबाह्यपद्धतीने त्यावर मेवेशी बाजार व चंपाषष्ठी मेला लाऊन ठेकेदार यांच्याकडून मोठी रक्कम वसूल करण्यात येते. तर नगर परिषदचा संपूर्ण महसूल बुडवण्यात येत आहे . या प्रकरणाची चौकशी करून कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ यांच्याविरुद्ध अपात्र ठरवण्याची कार्यवाही करण्यात यावी व प्रशासक बसविण्यात यावें अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पत्रपरिषदेत प्रमोद शिवणकर, तीरथ येटरे, रामकिशन शिवणकर,बाळू वंजारी, सागर फुंडे,राम चक्रवर्ती, यशवंत मानकर, दिलीप फुंडे. पिंटू महारवाडे, विनोद डोये, मुकेश शिवणकर,मेघश्याम फुंडे, किशोर फुंडे, सतीश शिवणकर, सतीश थेर, विजय शेंडे, सतीश दोनोडे, लक्ष्मण शेंडे,तेजस कावळे, डॉ. ओमप्रकाश थेर, गोकुल बसेन,दिलीप मेश्राम, मोणू गिरी , संदीप भांडारकर,शिरीष भांडारकर,जितेश वाढई , मेघश्याम मेंढे आदी नागरीक व युवक यावेळी उपस्थित होते.